शनिवार, २७ मे २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२५८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 27 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-258 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# संसद उद्घाटन प्रकरण

## सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : संसद भवनाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनाबाबत सुरू असलेल्या वादाशी संबंधित जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर स्वतःहून सुनावणी करण्यास नकार दिला. याचिका फेटाळून लावत न्यायालयाने म्हटले की, ही याचिका का दाखल करण्यात आली हे आम्हाला माहीत आहे. अशा याचिकांकडे लक्ष देणे हे सर्वोच्च न्यायालयाचे काम नाही. या याचिकेचा फायदा कोणाला होणार? यावर याचिकाकर्त्याला नेमके उत्तर देता आले नाही. नव्या इमारतीचे राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून लोकसभा सचिवालयाला निर्देश देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती.**



सर्वोच्च न्यायालयातील वकील सीआर जया सुकीन यांनी ही जनहित याचिका दाखल केली. उद्घाटन समारंभात राष्ट्रपतींचा समावेश न केल्यानं भारत सरकारने भारतीय संविधानाचे उल्लंघन केले आहे, असे त्यात म्हटले आहे. असे करून संविधानाचा आदर केला जात नाही. संसद ही भारताची सर्वोच्च विधिमंडळ संस्था आहे. भारतीय संसदेमध्ये राष्ट्रपती आणि दोन सभागृहे ( राज्यांची परिषद ) राज्यसभा आणि लोकसभेचा समावेश होतो. राष्ट्रपतींना दोन्ही सभागृहांना बोलावून निलंबित करण्याचा अधिकार आहे. तसेच संसद किंवा लोकसभा विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. अशा परिस्थितीत संसदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हायला हवे. २८ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी नवीन संसद भवनाचे उद्घाटन करणार आहेत. यावर काँग्रेस आणि इतर अनेक विरोधी नेत्यांचे मत आहे की, पंतप्रधानांऐवजी राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन करावे. नवीन संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींनीच करावे, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. मुर्मू यांच्या हस्ते नवीन संसद भवनाचे उद्घाटन हे लोकशाही मूल्ये आणि घटनात्मक शिष्टाचारासाठी सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक असेल, असंही काँग्रेसनं सांगितलं आहे. नवीन संसद भवन उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी करावे यासाठी लोकसभा सचिवालय आणि केंद्र सरकारला निर्देश द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. लोकसभा सचिवालय आणि केंद्र सरकार राष्ट्रपतींना उद्घाटन सोहळ्याचे आमंत्रण न देऊन त्यांचा अपमान करीत आहेत, असा आरोप याचिकेत करण्यात आला होता. यावरून काँग्रेसनंही केंद्रातल्या मोदी सरकारवर हल्लाबोल केला होता. संसद हे लोकांनी स्थापन केलेले लोकशाहीचे मंदिर आहे. राष्ट्रपती कार्यालय हा संसदेचा भाग आहे. तुमच्या अहंकारांमुळे देशाची संसदीय प्रणाली उद्ध्वस्त झाली आहे. संसद भवनाचे उद्घाटन करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार तुम्हाला का हिरावून घ्यायचा आहे हे १४० कोटी भारतीयांना जाणून घ्यायचे आहे, असंही काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले आहेत.

# तर लोकशाही काय चाटायची आहे?

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** नव्या संसदेच्या उद्घाटनाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण देण्यात आलेलं नाही. या मुद्द्यावरुन काँग्रेससह २० विरोधी पक्षांनी २८ मे रोजी होणाऱ्या नव्या संसद भवनाच्या उद्घाटन सोहळ्यावर बहिष्कार घातला आहे. या मुद्द्यावरुन मोदी सरकारवर दररोज टीका केली जाते आहे. ठाकरे गटाने सामनाच्या अग्रलेखातूनही आज मोदींना खडे बोल सुनावले आहेत. जर विरोधकांच्या भूमिकेला महत्त्वच नसेल तर लोकशाही काय चाटायची आहे का? असा सवालही सामनातून करण्यात आला आहे. तसंच राष्ट्रपतींना निमंत्रण दिलेलं नाही किमान आडवाणींसाठी तरी एक कोपरा आहे का? असा खोचक प्रश्नही विचारण्यात आला आहे.

भारतीय जनता पक्ष लोकांना भ्रमित करण्यात पटाईत आहे. लोकांना पेडगावचा रस्ता दाखवायचा व वेडगावला न्यायचे असे त्याचे धोरण आहे. दिल्लीत रविवारी संसद भवनाचे उद्घाटन होत असून २० विरोधी पक्षांनी उद्घाटन सोहळ्यावर बहिष्कार घातला आहे. बहिष्काराची पर्वा न करता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फीत कापायचे ठरवले असेल तर तो त्यांचा प्रश्न. संसद भवनाच्या उद्घाटनावर २० राजकीय पक्षांनी बहिष्कार घातला यावर भाजपाचे लोक टीका करत आहेत, पण सत्य असे आहे की २० प्रमुख पक्षांचा विरोध हा संसदेच्या उद्घाटनाला नाही तर उद्घाटनाचे साधे निमंत्रणही राष्ट्रपतींना नाही हा वादाचा मुद्दा आहे. संसदेचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते होणे हे परंपरेला धरुन झाले असते. पण हे नवे संसद भवन मी बांधले, ही माझी इस्टेट आहे, उद्घाटनाच्या कोनशिलेवर फक्त माझेच नाव राहिल मी आणि फक्त मीच असे मोदींचे धोरण आहे. नवे संसद भवन हे भारतीय संस्कृती आणि परंपरांशी आधुनिकतेची नाळ जोडणारी इमारत असून समृद्ध लोकशाहीचे प्रतीक असल्याचे गृहमंत्री अमित शाह यांननी म्हटले. लोकशाहीवर या मंडळींनी बोलणे हा एक विनोद आहे. नवे संसद भवन हे काही एखाद्या पक्षाच्या मालकीचे नाही. नटवरलाल नावाच्या एका भामट्याने संसद, राष्ट्रपती भवन, ताजमहाल, इंडिया गेट बनावट कागदपत्रांद्वारे विकल्याची दंतकथा प्रसिद्ध आहे तसे हे नवे संसद भवन बनावट कागदपत्रांद्वारे कुणी मालकीचे करुन घेतले की काय? असाही प्रश्न सामनाच्या अग्रलेखात विचारण्यात आला आहे.

# डॉन अबू सालेमचा भाचा आरिफला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अंडरवर्ल्ड डॉन अबू सालेमचा भाचा आरिफ याला उत्तर प्रदेश पोलिसांनी अटक केली आहे. फूटपाथवरील एका चहाच्या टपरीसमोर उभा राहून तो चहा पित होता. तेवढ्यात उत्तर प्रदेश पोलिसांच्या एका पथकाने धाड मारली आणि आरिफला पकडलं. फरार माफियांच्या यादीत आरिफचं नाव समाविष्ट केल्यापासून तो उत्तर प्रदेश पोलिसांच्या रडारवर होता. त्याला शोधण्यासाठी पोलिसांनी देशात अनेक ठिकाणी छापेमारी केली. पण तो हाती लागला नव्हता. अखेर तो मुंबईत पोलिसांच्या हाती लागला. उत्तर प्रदेश पोलिसांनी आरिफला वांद्रे हिल रोडजवळ पकडलं. पोलीस गेल्या अनेक महिन्यांपासून आरिफच्या शोधात होता. पोलिसांना चकमा देत तो मुंबईत पोहोचला आणि काही दिवसांपासून तो मुंबईतचं राहात होता. पोलिसांना त्यांच्या खबऱ्यांकडून माहिती मिळाल्यानंतर उत्तर प्रदेश पोलिसांचं एक पथक वांद्रे येथे दाखल झालं. आरिफ एका रस्त्याकडेला फूटपाथवर चहा पित होता. त्याला पकडायला आलेला पोलीस खाकी गणवेशात नव्हते. सर्वच पोलीस हे साध्या कपड्यांमध्ये होते. जेणेकरून आरिफला पोलिसांच्या या ऑपरेशनबद्दल सुगावा लागू नये आणि तो तिथून पळून जाऊ नये. आरिफला पकडतानाचा एक व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडीओत स्पष्ट दिसतंय आरिफ चहाच्या दुकानासमोर उभा आहे. माफिया अतिक अहमद आणि अशरफच्या हत्येनंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी सध्या फरार आरोपींना शोधून काढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी आज अबू सालेमचा भाचा आरिफला अटक केली आहे. माफिया अतिक अहमद आणि अशरफच्या हत्येनंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी सध्या फरार आरोपींना शोधून काढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी आज अबू सालेमचा भाचा आरिफला अटक केली आहे.

# वाळूची अवैध वाहतूक; पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** पोलिस स्टेशन हद्दीतील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर शेवगाव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करत तब्बल १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दि. २६ रोजी सकाळी ९:१० वाजता मुंडे चौक बोधेगाव येथे एक टाटा कंपनीचा पांढऱ्या रंगाचा एम एच क्रमांक ३२ क्यु ३७७२ डंपर रोडवरून जात असताना त्यास पोलीसांनी थांबविले असता डंपर चालकास ताब्यात घेऊन त्यांस नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव एकनाथ पांडुरंग मिसाळ वय ३४ वर्षे राहणार बोधेगाव तालुका शेवगाव असे सांगितले सदर डंपर चालकास वाळू वाहतूकीच्या परवाना बाबत पोलीसांनी माहिती विचारली असता त्यांच्याकडे कुठलाही परवाना आढळून आला नाही.सदर डंपर चालकाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर वाळू वाहतूक केली असल्याने शेवगाव पोलिस स्टेशन येथे सदर डंपर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच दि २४/05/2023 रोजी भगतसिंग चौक शेवगाव या ठिकाणाहून टाटा कंपनीचा पांढऱ्या रंगाचा एम एच क्रमांक १७ ए जी ५०५० डंपर चालकास वाळू वाहतूक सदर डंपर चालकाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर वाळू वाहतूक केली असल्याने शेवगाव पोलिस स्टेशन येथे सदर डंपर चालकास परवाना माहिती विचारली असता सदर डंपर चालकाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर वाळू वाहतूक केली असल्याने शेवगाव पोलिस स्टेशन येथे सदर डंपर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे या दोन्ही कारवाईमध्ये तब्बल १५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरच कामगिरी पोलीस अधिक्षक राकेश ओला अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी संदिप मिटके, श्रीरामपुर विभाग चार्ज शेवगाव यांचे मार्गदर्शनाखाली शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी, सपोनि, आशिष शेळके, पोना. रविंद्र शेळके, बाळासाहेब नागरगोजे, पोकॉ.बप्पासाहेब धाकतोडे, पोकॉ.राहुल खेडकर यांनी सदरची कामगिरी केली.


# राहुल गांधींचा ३ दिवस अमेरिका दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे ३० मेपासून तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर जाण्याचे नियोजन आहे. मात्र त्यांच्या पारपत्रासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत न्यायालय आज, शुक्रवारी देणार असलेल्या निर्णयावर त्यांचा हा दौरा अवलंबून असणार आहे. तीन दिवसांच्या या दौऱ्यात राहुल गांधी अनिवासी भारतीय समुदाय, उद्योजक आणि माध्यमांचे प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधणार आहेत. सॅन फ्रान्सिस्को, वॉशिंग्टन डीसी आणि न्यू यॉर्क या शहरांमध्ये त्यांचे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मात्र अखेरच्या क्षणी उद्भवलेला कायदेशीर अडथळा काँग्रेससाठी चिंतेचा विषय ठरला आहे. खासदार म्हणून अपात्र ठरल्यानंतर राहुल गांधी यांनी त्यांचे राजनैतिक पारपत्र 'सरेंडर' केल्यानंतर 'सामान्य पारपत्र' मिळण्यासाठी मागितलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत दिल्लीचे एक न्यायालय आज, शुक्रवारी निर्णय देणार आहे. या दौऱ्याच्या कार्यक्रमानुसार, राहुल हे सॅन फ्रान्सिस्को, वॉशिंग्टन डीसी आणि न्यू यॉर्क येथे दोन दिवस घालवणार आहेत. ३० मे रोजी सांता क्लॅरा येथील अनिवासी भारतीयांशी संवाद साधणार आहेत.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

प्रत्यक्ष जीवनातही आपल्याला या 'ह' च्या बाराखडीचा वापर करणारे पुष्कळ लोक भेटतात. त्यांचं बोलणं ऐकताना मोठी मजा येते. प्रसंगी स्वतःच्या चुकांवरही हसता आले पाहिजे. अशी माणसे मनाने निर्मळ असतात. पूर्वी आमच्याकडे एक दूधवाला दूध घालण्यासाठी यायचा. तो 'दूध घ्या' म्हणायच्या ऐवजी त्याच्या खर्जातल्या आवाजात 'चला, भांडं घ्या' असं म्हणायचा. मला त्याची खूप गंमत वाटायची. आमच्याकडे भांड्याधुण्यासाठी येणाऱ्या बाई बाहेरच उभ्या राहून फक्त ' ताईsss ' असा आवाज देतात. मग आपण समजून घ्यायचं की त्यांना भांडीधुणी करायची आहेत. कधी कधी एखाद्या ठिकाणी स्फोटक किंवा तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आणि अशा वेळी कोणी एखादा हलकाफुलका विनोद केला तर वातावरणातील तणाव लगेच निवळायला मदत होते. आमच्या शाळेत घडलेला एक किस्सा आहे.

एकदा वार्षिक परीक्षा सुरु असताना झालेल्या पेपर्सचे गठ्ठे तपासण्यासाठी शिक्षकांना वाटप करण्यात येत होते. विद्यार्थी आणि वर्गसंख्या वाढल्याने एका शिक्षिकेला तपासण्यासाठी जास्त पेपर्स दिले गेले. साहजिकच त्या चिडल्या. तेथे असणाऱ्या अधिकाऱ्यांचे आणि त्यांचे दोन दोन शब्द झाले. वातावरण तापले. त्या शिक्षिका रागाने त्या अधिकाऱ्याला विचारू लागल्या, एवढे पेपर्स मी कसे तपासायचे ?' एक ज्येष्ठ पण मिश्किल शिक्षक तिथे हजर होते. ते म्हणाले, ' लाल पेनने तपासा...' आणि एकदम हास्याचा स्फोट झाला. तणावपूर्ण वातावरण क्षणात निवळले आणि गंमत म्हणजे त्या शिक्षिकाही हास्यात सामील झाल्या.

हसण्याची क्रिया ही अशी एक क्रिया आहे की ज्यामध्ये आपल्या मेंदूचा डावा आणि उजवा भाग एकाच वेळी काम करतात. आपण ऐकलेली गोष्ट किंवा वाचलेली गोष्ट मेंदूचा डावा भाग समजून घेतो. उजवा भाग ती गोष्ट गंभीर आहे की विनोदी याची छाननी करतो. विनोदी गोष्ट असेल तर आपल्याला हसू येते. अशा रीतीने शरीराचे सर्व अवयव जेव्हा एकत्र येऊन काम करतात तेव्हा ते काम उत्तम होते. व्यायाम, हसणे, चालणे यासारख्या गोष्टीत आपल्या शरीरातील सर्व अवयवांचा सुरेख समन्वय घडतो. आरोग्यासाठी जसा उत्तम आहार आणि व्यायाम महत्वाचा तसाच निरोगी मनासाठी हास्योपचारही महत्वाचा. सखी शेजारिणी तू हसत राहा या गीतात ते सखी शेजारणीला उद्देशून म्हटले असले तरी ते आपल्या सगळ्यांसाठी पण आहे असे समजायला हरकत नाही. ' प्रकाशातले तारे तुम्ही ' या कवितेत कवी उमाकांत काणेकर म्हणतात, ' रडणे हा ना धर्म आपुला, हसण्यासाठी जन्म घेतला. ' पुढे ते म्हणतात, ' सर्व मागचा विसरा गुंता, अरे उद्याच्या नकोत चिंता...' खरंच मागचा सगळा गुंता,समस्या टाकून देऊन हसता आले पाहिजे म्हणजे ' आनंदाच्या शिखरावरती खुशाल जाऊन बसा ' अशी स्थिती प्राप्त होईल.



## आनंदी पहाट

## जसे विचार तसेच अनुभव

आधुनिक केसरी

मेंदूतील रासायनिक बदल हा पोषक तत्वांची कमतरता, झोपेचा विकार, साखरेच्या अतिसेवनामुळे बॅक्टेरियांची वाढ, नैराश्य किंवा थायरॉईडच्या स्थितीचे लक्षण असू शकतात. इतर सामान्य मेंदूच्या रासायनिक बदलांच्या कारणांमध्ये खूप वेळा खाणे, निष्क्रियता, पुरेशी झोप न मिळणे, दीर्घकाळचा ताण आणि खराब आहार यांचा समावेश होतो. नकारात्मक माहितीमुळे मेंदूच्या महत्त्वपूर्ण माहिती प्रक्रिया क्षेत्रामध्ये क्रियाकलाप वाढतात, आपले वर्तन आणि वृत्ती, वाईट बातम्या, अनुभव आणि माहिती यांच्याद्वारे अधिक प्रभावीपणे आकार घेतात. दररोजच्या चिंता तुमच्या विचारांमध्ये तुम्हाला अडकवतात, तर काही चिंता अनेकदा शरीरात शारीरिकरित्या प्रकट होतात. त्यामुळे तुम्हाला अशक्त किंवा हलके वाटू शकते. चिंताग्रस्त विकार वयानुसार वाईट होतातच असे नाही, परंतु चिंताग्रस्त लोकांची संख्या आयुष्यभर बदलते. वृद्धापकाळात चिंता अधिक सामान्य होते आणि मध्यमवयीन प्रौढांमध्ये सर्वात सामान्य असते. मेंदूतील रासायनिक प्रक्रियांमुळे चिंता प्रबळ तेव्हा होते, जेव्हा एखाद्या व्यक्तीला चिंता वाटते आणि त्याला लक्ष केंद्रित करण्यास किंवा स्पष्टपणे विचार करण्यास त्रास होत असतो. मानसिक आरोग्य निदान आणि शारीरिक आजारांसह अनेक परिस्थितींमुळे चिंता निर्माण होऊ शकतात. अधूनमधून चिंता अनुभवणे सामान्य आहे असे वाटत असले तरीही, विशेषतः उच्च तणावाच्या काळात त्याचा खूप मोठा आणि विपरीत परिणाम भोगावा लागत असतो. नकारात्मक दृष्टीकोन आणि असहायता तसेच निराशेच्या भावना दीर्घकालीन तणाव निर्माण करू शकतात, ज्यामुळे शरीरातील संप्रेरक संतुलन बिघडते. आनंदासाठी आवश्यक असणारी मेंदूतील रसायने कमी होतात आणि रोगप्रतिकारक शक्ती बिघडत जाते, दीर्घकालीन तणावामुळे आपले आयुर्मान देखील कमी होऊ शकते. जेव्हा आपण विचार करतो की काहीतरी वाईट होईल तेव्हा हमखास काहीतरी वाईटच घडते. म्हणजेच आपण जसा विचार करतो तसेच घडते.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**विठु चे स्मरण | फलदायी ||**
**साधक बाधक | करावा विचार ||**
**ठेवावा आचर | शुद्ध रूप ||१||**
**अविचारी कर्म | घातक तू जाण ||**
**क्लेशदायी मन | क्षणोक्षणी ||२||**
**स्वार्थासाठी नको | फसवू कोणाला ||**
**जाग विवेकाला | सर्वकाळ ||३||**
**सन्मार्ग दावती | संतजन सारे ||**
**जाण ते सोयरे | जन्मोजन्मी ||४||**
**विटेवरी उभा | सकलांचा बाप ||**
**नको मारू थाप | कधीकाळी ||५||**
**पुण्याचे साधन | शुद्ध आचरण ||**
**विठुचे स्मरण | फलदायी ||६||**


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

**सुहास्यवदनामम्बां**
**चारुनयनशोभिताम्|**
**तापत्रयविनाशाय**
**दुर्गां देवीं नमाम्यहम्|| १० ||**
**सुहास्यवदन, सुंदर नयनांनी सुशोभित**
**अशा अम्बेला, दुर्गा देवीला तीनही**
**तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**अनेक जन्म दुख मरण के, त्रास वासना लाग । अभिनिवेश ताको कहूँ, सुनु नाशक अनुराग ।।२४९।। परम विहंग समाधि में, अनुभव शब्द प्रकाश । जीवन्मुक्ती होइ सो, पंच क्लेश ता नाश ।।२५०।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/२४९, २५०**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

अनेक जन्मांमध्ये अनुभवलेल्या जन्म- मृत्यूच्या यातनांचे भय जे आत्म्यामध्ये वर्तमान असते, त्यास अभिनिवेश असे म्हणतात; जे प्रेम-नाशक आहे. मृत्यूच्या भयाने कुठलाही प्राणी मरू इच्छित नाही. प्राकृतिक दुःखं असूनही त्याचे आपल्या शरीरावर प्रेम असते. म्हणून हे भय शुद्ध चेतन प्रेम नष्ट करणारे आहे. विहंगम योगाच्या सर्वोच्च विज्ञानाद्वारे समाधी अवस्थेच्या प्राप्तीने शब्द ब्रह्माचा अनुभव होतो. त्यामुळे जीवन्मुक्त अवस्थेची उपलब्धता होते, जी सर्व क्लेशांना नष्ट करणारी आहे.


स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी


मूळ चैतन्य अनाम व अरूप आहे. मायेने समाजाने त्याला अनेक नावे दिलेत तेव्हा परमेश्वर व परमात्म विषयी शंका घेऊ नये हेच खरे होय. निराकार ब्रम्हामध्ये मूळमाया कशी निर्माण झाली. आपल्याला  जादूगार त्याच्या पोतडीतून अनेक खेळ काढून दाखवतो तसेच हे दृष्याने भरलेल् जग परमात्मा आपल्याला दाखवतो. आकाश अत्यंत निश्चल व चंचंल आहे. हलणारा वायु ऊत्पन्न झाला तरी आकाश न हालता ते जसेच्या तसे रहाते. त्यामध्ये अगदीच निराकार व निश्चल ब्रम्हामध्ये मूळमाया निर्माण झाली.  मित्रांनो वायु उत्पन्न झाला त्यामुळे आकाशाला तडा गेला,आकाश.भंगले असे कधीच झाले नाही, त्याचप्रमाणे मूळमाया जरी उत्पन्न झाली तरी परब्रम्हाच्या निर्गुण पणामध्ये किंचितही भंग होत नाही ते अगदीच जसेच्या तसेच रहाते. याचा अभ्यास साधकाने स्वतः करावा व आपल्या शंकेचे निरसन करावे असे मला वाटते. वायु हा आकाशाइतका पुरातन नाही, त्याप्रमाणे मूळमाया काही परब्रम्हाच्या सारखी सनातन नाही. शिवाय वायु जसा आकाशात एकरूप होतो.त्याप्रमाणे मुळमाया परब्रम्हामध्ये एकरूप होऊन जाते. वायु वहातो पण त्याला आकार नाही रूप नाही. वायु आपण हातात घेउन दाखवू शकत नाही. त्याच प्रमाणे मूळमाया आहे खरी पण आपल्याला तिचे अस्तित्व जाणवते. पण आपण तिला हातात घेऊन दाखवू शकत नाहीत.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निश्चयपूर्वक नामस्मरण आणि चित्तशुद्धी

आधुनिक केसरी

मला अजून अमुक करायचे आहे ही कल्पना सोडून द्यावी. आता मी परमेश्वराचा झालो, आता मला काही करायचे राहिले नाही, अशी मनाची स्थिती झाली पाहिजे. 'हे परमेश्वरा, आता तुझ्याकरताच मी जगेन, तुझ्या नामस्मरणाशिवाय मला काही कर्तव्य उरले नाही.' असा निश्चय केला तर मनाला समाधान झालेच पाहिजे. 'नामस्मरण होत नाही, कारण वयामुळे मन थकले,' हे म्हणणे बरोबर नाही. शरीर थकेल, कारण लहानपणी वाढणे आणि वृद्धपणी थकत जाणे, हा शरीराचा निसर्गक्रमच आहे; परंतु मन थकले हे मात्र सयुक्तिक नाही. मन हा परमेश्वराचा अंश आहे, असे आपल्या दिव्य विभूती सांगताना भगवंतांनी सांगितले आहे. मनाची अत्यंत क्षीणतेची अवस्था म्हणजे मृत्युसमयीची; परंतु त्या समयीही माझे स्मरण ठेवावे असे भगवंतांनी सांगितले असताना, त्यापूर्वी केव्हाही, मन थकले आणि स्मरण करू शकत नाही असे होणे शक्य नाही. पूर्वी सहा-सहा तास बसून जप केलेला असेल, तितका आता होत नसेल, तितके बसवणार नाही. मध्ये-मध्ये झोप लागत असेल, हे मान्य आहे; पण स्मरण राहू शकत नाही असे नाही होणार. मन थकले ही खरी अडचण नसून मनाचा इतर व्याप फार आहे हे खरे कारण आहे. तेव्हा, सर्व व्यापांतून आणि काळजीतून लक्ष काढून ते भगवंताकडे लावणे जरूर आहे. पैसाअडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी, यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो हे मी खात्रीने सांगेन.



पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा, माणसाला भगवंतापासून दूर नेतात; त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे, त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत. धर्माचरण, भगवद्भक्ती, नामस्मरण आणि सत्संग हे चित्तशुद्धीचे उपाय होत. किंवा एकाच शब्दात असे म्हणता येईल की, सत्संग हाच याला तोडगा आहे. चित्तशुद्धीचे लक्षण हे की, आपल्यासारखेच सर्व जग सुखी असावे ही भावना असणे. ही भावना वाढण्यासाठी, 'सर्व जग सुखी असावे' अशी प्रार्थना करण्याचा नेहमी परिपाठ ठेवावा, म्हणजे हळूहळू भगवत्कृपेने साधेल. अभिमान हा मात्र चित्तशुद्धीत बिघाड करणारा आहे, आणि तो केव्हा डोके वर काढील आणि घात करील याचा पत्ता लागणार नाही. पण भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे. म्हणून आपण भगवंताचे स्मरण अखंड टिकवूया आणि आनंदाने राहूया. **आजचे बोधवचन आहे – १२४. नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही अशी दृढ भावना करावी. श्रीराम समर्थ**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**तक्षकस्य विषं दंशे मक्षिकायाच मस्तके ।**
**वृश्चिकस्य विषं पुच्छे सर्वांगे दुर्जनस्य तत् ॥**
**स्पष्टीकरण - या श्लोकाचा रोख दुर्जनांकडे आहे. कोणत्याही परिस्थितीत दुर्जनांपासून सावध राहावे असे यात सांगायचे आहे. दुर्जन हा शरीर, मन, वाणी, बुद्धी या सर्वांगांनी विषारी असतो.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २७ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# आमचे विरोधक एकमेकांच्या दारी जातात मात्र आम्ही शासन आपल्या दारी आणले

## कन्नड येथे मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरे यांना टोला




आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे शासन आपल्या दारी या अभियाना अंतर्गत विविध योजनेच्या लाभाचे वितरण करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, डॉ. भागवत कराड, हरीभाऊ बागडे, कृषीमंत्री अब्दुल सत्तार, पालकमंत्री संदिपान भुमरे, आ. रमेश बोरणारे, माजी आमदार नितिन पाटील, जिल्हा प्रमुख भरतसिंग राजपुत, संजना जाधव जिल्हा अधिकारी अस्तीककुमार पांड्ये उपजिल्हा अधिकारी जनार्दन विधाते तहसीलदार विद्याधर कडवकर यांची प्रमुख उपस्थीती होती .

हा कार्यक्रम शासकीय असल्याने सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी कामाला लागले होते या कार्यक्रमासाठी पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त होता. लाभार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था पिण्याच्या पाण्याची व जेवणाची व्यवस्था केलेली होती. या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलतांनी म्हणाले आमचे सरकार आल्याने शासन आपल्या दारी या अभियाना अंतर्गत विविध योजनेच्या लाभाचे वितरण एकच वेळी लाभ देण्यात आला शेतकऱ्यांना नुकसान भरपाई शेतकऱ्यासाठी विविध जोडधंदया साठी निधी उपलब्ध करून दिला. केंद्र सरकारही शेतकरी साठी खंबीर पणे उभे आहे शेतकऱ्यांसाठी मोदी साहेब शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. रेल्वे भुयारी मार्ग समृद्धी विविध प्रकल्पासाठी मोदी साहेब नेहमी मागीतले तेवढे बजेट देत आहे. काही राजकीय लोक परदेशात जाऊन आपली बदनाम करत आहे असे विरोधकाला टोला लावला. सर्व सामान्याला गरीबीतून वर काढण्याचा काम पंतप्रधान मोदी यांनी केले. संसद भवनाच्या कामाला विरोध करण्याच काम विरोधक करत आहे. आमचे विरोधक एक मेकाच्या दारी जात आहे मात्र आम्ही शासन आपल्या दारी आणलय असा खोचक टोला उध्वव ठाकरे केजरीवार व शरद पवार लावला आहे. किती आले किती एक जुटी केल्या तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींनाकोणी थांबवू शकत नाही. यावेळी नायब तहसीलदार मोनाली सोनवणे मंडळ अधिकारी सतिष भदाने साह्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके तात्याराव भालेराव सर्व शासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थीती होती .

# चोरटे असल्याचे समजून गस्तीपथकावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानातील चित्त्यांना त्यांची सीमा माहिती नाही, त्यामुळे आता एक-एक करुन चित्ते उद्यानाची सीमा पार करुन बाहेर पडत आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी चित्ता गस्ती पथकही बाहेर पडले, पण गावात चोर शिरल्याचे समजून गावकऱ्यांनी या गस्तीपथकावर हल्ला केला आणि हवेत गोळीबार करत बेदम मारहाण केली. यात मध्यप्रदेश वनखात्याचे चार कर्मचारी जखमी झाले. कुनो राष्ट्रीय उद्यानातून चित्ते वारंवार बाहेर पडत आहेत. त्यामुळे त्यांना शोधण्यासाठी चित्त्याच्या गस्ती पथकालाही बाहेर जावे लागत आहे. नर चित्ता दोनदा या उद्यानातून बाहेर पडल्यानंतर आता मादी चित्ता देखील बाहेर पडली. तिच्या गळ्यातील जीपीएसच्या आधारे शोध घेत हे पथक बाहेर पडले. रात्रीच्या सुमारास ही चमू शिवपूरीच्या बुरखेडा गावाजवळून गेली. रात्रीच्या सुमारास वाहनाने इतके सारे जण एकत्र पाहून गावकऱ्यांना ते गुरे चोर वाटले आणि त्यांनी गोळीबार केला. या पथकातील कर्मचाऱ्यांना त्यांनी मारहाण केली. या दगडफेकीत वाहनांचे नुकसान तर झालेच, पण पथकातील चार कर्मचारीदेखील जखमी झाले. बुरखेडा गावात या पूर्वीदेखील चोरीच्या दोन-तीन घटना घडल्या. तसेच या गावात दरोडेखोरांच्या हालचाली देखील आहे. चित्ता पथक गावातून तीन-चार वेळा गेल्यामुळे गावकऱ्यांना ते दरोडेखोर असल्याचा संशय आला आणि त्यांनी मारहाण केली.





नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

संपर्क : मो. 7588818406


# तीन सुपर फास्ट रेल्वे गाड्यांचा थांबा मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** करोना संक्रमण काळात अनेक गाड्यांचे थांबे बंद करण्यात आले होते. वर्षभरापासून बहुतांश थांबे टप्प्याटप्प्याने सुरू झाले. हिंगणघाट येथे मात्र स्थिती 'जैसे थे' असण्याच्या पार्श्वभूमीवर खासदार रामदास तडस यांनी पाठपुरावा सुरू केला होता. रेल्वे मंत्री आश्विन वैष्णव यांना भेटून त्यांनी प्रवाशांच्या भावना सांगितल्या. थांबे बंद असल्याने लोक संतप्त असल्याचे दिसून येत होते. अखेर थांबे सुरू करण्याचे पत्र येवून धडकले आहे. चेन्नई ते माता वैष्णोदेवी कटरा अंदमान एक्स्प्रेस, चेन्नई ते जयपूर एक्स्प्रेस व गोरखपूर ते कोचुवेलू राप्ती सागर एक्स्प्रेस या गाड्यांचा थांबा मान्य करण्यात आला आहे. खुद्द रेल्वे मंत्री वैष्णव यांच्या स्वाक्षरीने हे मंजूर थांबे तडस यांच्याकडे आले आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसने बंद थांबे पूर्ववत सुरू करण्याची मागणी करीत रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या गाड्या केव्हापासून थांबायला सुरुवात होणार हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.



# डेहराडून-दिल्ली वंदे भारत एक्स्प्रेस सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**डेहराडून :** अनेक आव्हाने असतानाही भारताने गेल्या काही वर्षांमध्ये ज्या प्रकारे आपली अर्थव्यवस्था बळकट केली आहे त्याचे जग कौतुक करते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी दिल्ली- डेहराडून वंदे भारत एक्स्प्रेसचे दूरसंवादाद्वारे उद्‌घाटन करताना सांगितले. उत्तराखंडमधील रेल्वेमार्गाच्या शंभर टक्के विद्युतीकरणाचेही पंतप्रधानांनी या वेळी उद्‌घाटन केले. प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेली उत्तराखंडसाठीची अशा प्रकारच्या या पहिल्या गाडीमुळे डेहराडून आणि राष्ट्रीय राजधानीदरम्यानचा प्रवास साडेचार तासांमध्ये करता येणार आहे. सध्या शताब्दी एक्स्प्रेस हे अंतर सहा तास व दहा मिनिटांमध्ये कापते. 'जागतिक पर्यटक हा देश पाहण्यासाठी व समजून घेण्यासाठी भारताला भेट देतात. उत्तराखंडसाठी ही फार मोठी संधी आहे,' असे पंतप्रधान उद्‌घाटनप्रसंगी म्हणाले. मी आत्ताच तीन देशांच्या दौऱ्यावरून परतलो असून, जग भारताकडे मोठया आशेने पाहते, असे मी सांगू शकतो, असे या गाडीला हिरवा झेंडा दाखवल्यानंतर केलेल्या भाषणात मोदी म्हणाले. देवभूमी उत्तराखंडला वंदे भारत एक्स्प्रेस दिल्याबद्दल आणि राज्यातील सर्व रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण केल्याबद्दल मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी राज्यातील नागरिकांच्या वतीने पंतप्रधान मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पंतप्रधान मोदी यांच्या विशेष प्रेमामुळे डेहराडून ते दिल्ली प्रवास केवळ साडेचार तासांत पूर्ण होईल, असे धामी म्हणाले. 'उत्तराखंडच्या पहाडांवर रेल्वे नेण्याचे स्वप्न आता प्रत्यक्षात येत आहे,' या शब्दांमध्ये त्यांनी आनंद व्यक्त केला.




# डब्लयूएचओचा इशारा

आधुनिक केसरी

गेल्या तीन वर्षांमध्ये संपूर्ण जगाने करोनासारख्या साथीच्या रोगाची लाट पाहिली. या रोगापासून बचावासाठी जगभरातील सर्वच देशांमध्ये लॉकडाऊन घोषित करण्यात आले. लोकांना स्वतःचे घर सोडून कुठेही जाता येत नव्हते. त्याचबरोबर या रोगाने लाखो लोकांचा जीव घेतला. लाखो कुटुंबं रस्त्यावर आली. २०१९ पासून सुरू झालेला हा रोग आता कुठे संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. परंतु हे शक्य झाले कारण संशोधक या रोगावर लस तयार करू शकले म्हणून. परंतु तुम्हाला वाटते का, आता सगळे सुरळीत झाले आहे. किंवा इथून पुढे कधी असा रोग येणार नाही. तुम्हाला जर वाटत असेल की, आता जगाची अशा रोगापासून सुटका झाली आहे तर तुम्ही चूक करताय. करोनाची लाट ओसरल्यानतंतर आणि यावर लस तयार झाल्यानंतर परिस्थिती सुरळीत झाली आहे असे आपल्याला वाटत असले तरी वैज्ञानिक पुढच्या संकटामुळे चिंतेत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) प्रमुखांनी अलिकडेच केलेले एक वक्तव्य जगाच्या चिंता वाढवणारे आहे, तसेच वैज्ञानिकांना अधिक सतर्क करणारे आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अध्यक्षांनी जगाला येणाऱ्या साथरोगासाठी तयार राहण्यास सांगितले आहे. त्यांच्या मते हा रोग करोनापेक्षा महाभयंकर आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रायोरिटी डिसीज नावाने एक रोगांची यादी आहे. यामध्ये प्राणघातक साधीच्या रोगांचा समावेश आहे. या यादीत इबोला, सार्स आणि झिका यांसारख्या आपल्याला परिचित असलेल्या रोगांची नावे आहेत. त्यात आता डिसीज एक्स हे नाव समाविष्ट करण्यात आले आहे. सध्या या आजाराची ओळख पटलेली नाही, म्हणून आरोग्य संघटनेने या आजाराला एक्स असे नाव दिले आहे. याची ओळख पटली नसली तरी यामुळे मानवांमध्ये संसर्ग पसरण्याचा धोका आहे. डिसीज एक्स हा ज्या प्रकारचा रोग आहे ज्यावर लसी किंवा उपचारांचा अभाव दिसून येतो.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# बारावीनंतर विद्यार्थ्यांनी काय करावे ?

आधुनिक केसरी

**विद्यार्थी मित्रांनो नुकताच इयत्ता बारावीचा निकाल लागला.आपले सर्वांचे मनस्वी अभिनंदन.!! बारावीनंतर अनेक सामान्य अभ्यासक्रम, व्यावसायिक अभ्यासक्रम, इंग्रजी बोलण्याचे अभ्यासक्रम, डिप्लोमा अभ्यासक्रम आणि संगणक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. याशिवाय तुम्ही बारावीनंतर सरकारी नोकरीही करू शकता. बारावीनंतर काय करायचे हा विद्यार्थ्यांसमोर सर्वात मोठा प्रश्न असतो आणि अनेक अभ्यासक्रमांमधून सर्वोत्तम अभ्यासक्रम कसा निवडायचा या संभ्रमात विद्यार्थी व पालक असतात. असतात. त्यांच्या करिअरसाठी कोणता चांगला पर्याय आहे आणि त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी त्यांनी काय करायला हवे, असा प्रश्न तुमच्या समोर आहे. कारण तुमच्यासाठी, तुमच्या करिअरसाठी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.**

यावेळी विचार न करता घेतलेला चुकीचा निर्णय तुम्हाला आयुष्यभर पश्चात्ताप करण्यास भाग पाडू शकतो. त्यामुळे तुमची पात्रता, नोकरीचे चांगले पर्याय, तुमची आवड लक्षात घेऊन स्वतःसाठी योग्य पर्याय निवडा. तुमच्यासाठी कोणता पर्याय योग्य असेल, याचा काळजी पूर्वक विचार आपण विद्यार्थ्यांनी करावा. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुमच्यासाठी करिअरचा सर्वोत्तम पर्याय कोणता आहे. १२वी सायन्स (PCM) नंतर विद्यार्थी बी एस सी, बी टेक इत्यादी करू शकतात आणि PCB चे विद्यार्थीएम बी बी एस MBBS करू शकतात. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सी ए , सी एस, आणि बी कॉम निवडणे चांगले आहे, तर बी ए एल एल बी, , आणि बी जे एम सी कला विद्यार्थ्यांसाठी योग्य आहेत. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी बारावीनंतर काय करावे ? वाणिज्य शाखेचे विद्यार्थी बारावीनंतर फायनान्स, बँकिंग आणि अकाउंट्स या क्षेत्रात करिअर करू शकतात. त्यांच्यासाठी कोणते चांगले पर्याय आहेत ते आम्हाला कळू द्या. बारावी नंतर चार्टर्ड अकाउंटंट कोर्स सीए चार्टर्ड अकाउंटन्सी हा आजचा सर्वात प्रतिष्ठित अभ्यासक्रम आहे. बारावीच्या निकालानंतर कोणत्याही प्रवाहातील विद्यार्थी सीए अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था आणि जी एस टी सारख्या कर सुधारणांमुळे सी ए ची मागणी झपाट्याने वाढली आहे. हा अभ्यासक्रम इतर कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमापेक्षा स्वस्त आहे. आणि जर तुम्ही कठोर अभ्यास केला आणि मार्गदर्शनासाठी चांगल्या संस्थेतून कोचिंग घेतले तर तुम्ही ४ वर्षात कोर्स पास करू शकता. आणि १२वी उत्तीर्ण झाल्यानंतर 4 वर्षांनी तुम्ही चांगल्या कंपनीत सी ए म्हणून नोकरी करू शकता किंवा तुमचे काम स्वतंत्रपणे करू शकता. हा कोर्स केल्यानंतर तुमचे उत्पन्न वाढण्यासोबतच समाजात तुमची प्रतिष्ठाही वाढते.

१२ वी नंतर कंपनी सेक्रेटरी (CS) कोर्स करा सी.एस कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी कंपनी सेक्रेटरी हा देखील चांगला पर्याय आहे. कंपनी सेक्रेटरी कंपनीशी संबंधित सर्व आर्थिक आणि कायदेशीर बाबी चांगल्या प्रकारे समजून घेतात, त्यामुळे तो कंपनी इतर कोणापेक्षाही चांगल्या प्रकारे चालवू शकतो.

**बारावीनंतर बीबीए करा एमबीए**

१२ वी नंतर बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए) कोर्स हा देखील करिअरचा एक चांगला पर्याय आहे. पण बीबीए करण्याचा फायदा तेव्हाच होतो जेव्हा तुम्ही यानंतर मास्टर्स डिग्री एमबीए करता. तुम्ही चांगल्या कॉलेजमधून बीबीए आणि एमबीए केलेत तर तुमच्यासमोर करिअरचे अनेक पर्याय खुले होतात. एमबीए प्रोफेशनलचे काम कोणत्याही कंपनीचे व्यवस्थापन हाताळणे असते. कोणत्याही कंपनीच्या सीईओसारख्या उच्च पदांवर एमबीए व्यावसायिक आहे. पण एमबीए कोर्स हा महागडा कोर्स आहे.

**बारावीनंतर बी.कॉम**

कॉमर्समधून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही बी.कॉम. बी.कॉम केल्याने अकाऊंट्स आणि बिझनेस मॅनेजमेंट या विषयांची तुमची समज वाढते. आणि या ३ वर्षाच्या कोर्समध्ये तुम्हाला खूप काही शिकायला मिळेल. परंतु त्याच वेळी तुमचे कौशल्य वाढवण्यासाठी तुम्हाला बी.कॉम नंतर अतिरिक्त अभ्यासक्रम करणे आवश्यक आहे.

**बारावीनंतर बीएमएस करा**

बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BMS) हा ३ वर्षांचा कोर्स आहे. आणि कॉमर्सचे विद्यार्थी हा कोर्स केल्यानंतर अनेक चांगल्या कंपन्यांमध्ये नोकरीसाठी अर्ज करू शकतात. नोकरीसाठी हा खूप चांगला कोर्स आहे आणि त्यानंतर अनेक चांगल्या कंपन्या तुम्हाला नोकरी देतात.

**बारावी सायन्स नंतर विद्यार्थ्यांनी काय करावे**

जर तुम्ही बारावी सायन्स पास केली असेल तर तुमच्याकडे चांगल्या करिअरसाठी अनेक पर्याय आहेत. आज आम्ही तुम्हाला काही चांगले पर्याय सांगणार आहोत जे तुम्ही बारावी सायन्स पास केल्यानंतर करू शकता. पीसीएमचे विद्यार्थी बारावीनंतर बीटेक करतात. तुमची आवड अभियंता बनण्याची असेल, तर तुम्ही बारावी सायन्स उत्तीर्ण झाल्यावर बी.टेक करू शकता. बी टेक साठी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर अनेक परीक्षा असतात, त्या उत्तीर्ण झाल्यावर तुम्हाला बी टेक मध्ये प्रवेश मिळतो आणि त्यानंतर तुम्ही सिव्हिल इंजिनीअर, मेकॅनिकल इंजिनीअर किंवा सॉफ्टवेअर इंजिनियर होऊन चांगले करिअर करू शकता. पीसीबीचे विद्यार्थी १२वी नंतर



पीएमटी उत्तीर्ण होतात आणि एमबीबीएस करतात.

**एमबीबीएस**

जर तुम्ही बारावी बायोलॉजी उत्तीर्ण असाल आणि तुम्हाला डॉक्टर व्हायचे असेल तर तुम्हाला पीएमटी परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. पीएमटी म्हणजे प्री मेडिकल टेस्ट. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही एमबीबीएस करू शकता. हा अभ्यास पूर्ण करून ते डॉक्टर होतात. १२ वी नंतर बॅचलर ऑफ सायन्स (B.SC) करा. विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही विज्ञान शाखेतून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेऊ शकता. हा देखील एक चांगला पर्याय आहे, त्यानंतर तुम्ही नागरी सेवांसाठी अर्ज करू शकता. बी एस सी केल्यानंतर तुम्ही तुमचे कौशल्य वाढवण्यासाठी इतर कोणताही कोर्स करू शकता.

**बारावीनंतर एनडीएची तयारी करा.**

विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यावर जर तुम्हाला देशसेवेत जायचे असेल तर त्यासाठी तुम्ही एन डी ए ( NDA ) म्हणजेच राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची परीक्षा देऊ शकता. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास सैन्य, हवाई दल किंवा नौदलात सामील होऊ शकता. आणि देशसेवेच्या भावनेने, हा एक उत्तम करिअर पर्याय आहे. ज्यामध्ये तुम्हाला सन्मानासोबत चांगले पैसेही मिळतात.

**१२वी नंतर काय करावे**

कला शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना करिअरचे अनेक पर्याय असतात. चला तर मग जाणून घेऊया त्या करिअर पर्यायांबद्दल जे तुम्ही १२ वी उत्तीर्ण झाल्यावर करू शकता.

बारावीनंतर बीजेएमसी करा जर तुम्हाला तुमचे भविष्य पत्रकारितेच्या क्षेत्रात घडवायचे असेल तर तुम्ही बॅचलर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन (बीजेएमसी) कोर्स करू शकता. हा कोर्स तुम्ही कोणत्याही चांगल्या कॉलेजमधून करू शकता. हा कोर्स केल्यानंतर तुम्ही इलेक्ट्रॉनिक किंवा प्रिंट मीडियामध्ये करिअर करू शकता.

**बारावीनंतर हॉटेल मॅनेजमेंट कोर्स करा –**

जर तुम्हाला हॉटेल इंडस्ट्रीत तुमचे करिअर करायचे असेल तर बारावीनंतर तुम्ही हॉटेल मॅनेजमेंट कोर्स करू शकता. हा कोर्स केल्यानंतर तुम्ही कोणत्याही हॉटेलमध्ये नोकरीसाठी अर्ज करू शकता.

**१२ वी नंतर इव्हेंट मॅनेजमेंट कोर्स करा**

आजच्या काळात इव्हेंट मॅनेजमेंट हा एक उत्तम करिअर पर्याय म्हणून उदयास आला आहे. जर तुम्ही कोणताही कार्यक्रम व्यवस्थित व्यवस्थापित करू शकत असाल तर तुम्ही तुमच्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट कोर्स करू शकता. यानंतर तुम्ही लग्न, पार्टी किंवा कर अशा अनेक प्रकारच्या कार्यक्रमांचे इव्हेंट मॅनेजर बनून चांगली कमाई करू शकता. आजच्या काळात हा एक चांगला करिअर पर्याय आहे.

**बारावीनंतर लॉ (LLB) करा**

जर तुम्हाला वकिली करायची असेल आणि तुम्ही चांगला युक्तिवाद करू शकत असाल तर तुम्ही तुमचा करिअर पर्याय म्हणून वकिली निवडू शकता. यासाठी तुम्ही बारावीनंतर एलएलबी आणि एलएलएम करू शकता.

**१२ वी नंतर बॅचलर ऑफ आर्ट्स (BA) करा**

बारावी उत्तीर्ण झाल्यावर तुम्हाला ज्या विषयात रस असेल त्यात बीए करू शकता. बीए केल्यानंतर एमए करू शकता. ग्रॅज्युएशन आणि पोस्ट ग्रॅज्युएशननंतर तुम्ही सरकारी नोकरीसाठी अर्ज करू शकता. याशिवाय बीए केल्यानंतर अध्यापन क्षेत्रात जायचे असेल तर बीएड करा. याच्या मदतीने तुम्ही अध्यापनाच्या नोकरीसाठीही अर्ज करू शकता.

आम्हाला आशा आहे की हे सर्व करिअर पर्याय जाणून घेतल्यानंतर १२ वी नंतर काय करायचं तुमची समस्या दूर झाली असती. आणि या दिलेल्या पर्यायांमध्ये तुम्ही कोणताही चांगला करिअर पर्याय निवडू शकता.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आधुनिक केसरी

**आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले.**

मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी



बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुख:तू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# मासिक पाळी; पथनाट्यातून जनजागृती

## आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट संचालित 'उजास' प्रकल्पाचा उपक्रम; अद्वैतेषा बिर्ला यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मासिक पाळीभोवतीचा कलंक पुसण्यासह मासिक पाळीचे आरोग्य, स्वच्छता याबद्दल मोकळेपणाने संभाषण याविषयी जनजागृती करणाऱ्या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. उद्या (शनिवारी) जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस साजरा होत असताना आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा सामाजिक उपक्रम 'उजास'ने पुण्यात प्रभावी पथनाट्याचे सादरीकरण केले. 'ब्रेकिंग द सायलेन्स : लेट्स नॉर्मलाईज पीरियड्स' या शीर्षकाचे हे पथनाट्य पिंपरी व पुणे शहरात सहा ठिकाणी सादर झाले. पिंपरी येथील आदित्य बिर्ला हॉस्पिटलच्या परिसरात याचा शुभारंभ झाला. 'साद प्ले ग्रुप'ने शहरातील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या स्वयंसहायता गट, स्वारगेट बस डेपो, जंगली महाराज रस्ता, डी. वाय. पाटील विद्यापीठ अशा विविध ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थी, डॉक्टर आणि विविध घटकांशी संबंधित लोकांनी पथनाट्याचे सादरीकरण अनुभवले. पथनाट्यांसोबतच, 'उजास'ने वर्षभर जनजागृतीसाठी भिंतीवरील रंगकाम, दृष्टिहीनांसाठी कार्यशाळा आदी उपक्रम राबवले आहेत. मासिक पाळीच्या आरोग्याचे महत्त्व, योग्य स्वच्छतेच्या पद्धती आणि प्रचलित गैरसमज दूर करून महिला आणि पुरुष दोघांना शिक्षित आणि सक्षम करणे हा पथनाट्याचा उद्देश होता. उजासचा ठाम विश्वास आहे की, अशा प्रभावशाली नाटकांचे आयोजन मासिक पाळीबद्दल खुल्या चर्चेला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. पथनाट्याच्या प्रभावाविषयी बोलताना समाजप्रेरक, 'उजास'च्या संस्थापक अद्वैतेशा बिर्ला म्हणाल्या, "पथनाट्य हृदयाला मोहित करत मन मोकळे करणारा कला प्रकार आहे. समाजाला जागृत करून मुक्तसंवादाला प्रोत्साहन देण्याचे आमचे ध्येय आहे. त्यातून याबाबत बदल घडणार आहेत. पथनाट्याद्वारे समाजाला मासिक पाळीच्या बाबतीतील गैरसमज दूर करून मासिक पाळीच्या आरोग्याला जीवनाचा एक नैसर्गिक पैलू म्हणून स्वीकारण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवाहन करतो. 'उजास' पुणेच्या प्रमुख परवीन शेख म्हणाल्या, "आजवर २०७० मार्गदर्शन सत्रे आयोजिली आहेत. १३ वेगवेगळ्या ठिकाणी ३७८ शाळांमध्ये ८ लाख १५ हजार ९९८ सॅनिटरी पॅड वितरित केले आहेत. मासिक पाळीबाबतची अस्पृश्यता, गैरसमज, अंधश्रद्धा दूर करून खुल्या चर्चेला चालना देण्याची गरज आहे, असा विश्वास 'उजास'ला वाटतो. या उपक्रमाद्वारे, मासिक पाळीच्या स्वच्छता दिनानिमित्त पुण्यातील किमान १० हजार व्यक्तींशी संपर्क साधून त्यांना संभाषणात सामील होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न आहे. **'उजास'बद्दल :** 'उजास' हा आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा सामाजिक उपक्रम आहे. मासिक पाळीच्या संदर्भात असलेले गैरसमज कमी करून आणि पौगंडावस्थेतील मुली व महिलांना मासिक पाळी आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करण्यासाठी सक्षम बनवून भारतातील मासिक पाळीच्या आरोग्यावर सकारात्मक आणि शाश्वत प्रभाव निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'उजास'मार्फत मोफत सॅनिटरी पॅड देण्याची मोहीम राबवली जाते. वितरण वाहिन्या आणि जागरुकता मोहिमेद्वारे, या बदलाचा वारसा पुढे चालवला जात आहे. मासिक पाळीचे आरोग्य ही सर्वात ज्वलंत परंतु कमी-प्राधान्यिक समस्यांपैकी एक आहे, जी दुर्दैवाने सार्वजनिक आरोग्य आव्हान आणि प्रगतीशील राष्ट्र उभारणीतील अडथळा म्हणून लक्षात येण्याऐवजी स्त्रीची समस्या म्हणून विभागली जाते.



जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिन विशेष

# पिरामल फायनान्स टीमने केला धाराशिव जिल्ह्याचा दोन दिवसीय दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** पिरामल फायनान्स टीमच्या वतीने धाराशिव जिल्ह्याचा १८ मे ते १९ मे असा दोन दिवस दौरा करण्यात आला. ज्यामध्ये क्षेत्रभेटीद्वारे पिरामल फाउंडेशनच्या विविध कामकाजाची सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली. पिरामल फाउंडेशनचे शिक्षण, आरोग्य आणि पाणी यावरील कार्य समजून घेण्यासाठी अंगणवाडी, ग्रामपंचायत, शाळा आणि स्वयंसेवी संस्था यांना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. ज्यामध्ये वरुडा, बारूळ व जवळे दुमाला या ग्रामपंचायतींना भेटी देऊन विविध विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच तेथील अंगणवाड्यांना देखील भेट देण्यात आली. धाराशिव जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेल्या स्थानिक संस्था जसे आधार सामाजिक संस्था परांडा, कोहिजन सामाजिक संस्था तुळजापूर आणि हॅलो मेडिकल फाउंडेशन येथील संस्था प्रतिनिधींसोबत बैठकीच्या माध्यमातून विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सन्माननीय राहुल गुप्ता आणि सन्माननीय जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्यासोबत बैठक आयोजित केली होती यामध्ये शिक्षण आरोग्य व पाणी या विषयावरती चर्चा करून पुढे कशाप्रकारे जायचे आहे. यासंबंधीच्या रोड मॅप बद्दल चर्चा करण्यात आली.



# औरंगाबाद भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदासाठी सुहास शिरसाट यांचे नाव आघाडीवर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय जनता पार्टीच्या औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदासाठी फुलंब्री चे तालुका अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाट यांनी जिल्हाध्यक्ष पदासाठी मुलाखत दिली.



भारतीय जनता पक्षाच्या वतीने मुलाखती दरम्यान मावळते जिल्हाध्यक्ष विजय आवताडे यांनी पुन्हा एकदा औरंगाबाद जिल्हाध्यक्ष म्हणून साठी इच्छा व्यक्त केली आहे यासाठी फुलंब्रीचे तालुका अध्यक्ष सुभाष शिरसाट यांनी मुलाखत देऊन आपली बाजू मांडून औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदासाठी आपण तयार असल्याचे सांगितले. 8 मे रोजी भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या.तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील विविध पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, तालुका अध्यक्ष या जिल्हा अध्यक्ष पदासाठी रस्सीखेच स्पर्धा सुरू झाली आहे.इच्छुकांच्या मुलाखती घेऊन आपला अहवाल प्रदेशाध्यक्ष यांना पाठवले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्ष जाहिर होईल.

महाराष्ट्र Business Katta












# नागरिकत्व



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**आपण आपल्या राज्यघटनेच्या भाग-दोन मध्ये असलेल्या नागरिकत्वाबाबतच्या तरतुदींविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. आजच्या भागात आपण अनुच्छेद-६ विषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. अनुच्छेद-६:- पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क. या अनुच्छेद-६ ची पार्श्वभूमी व कायदेशीर वाक्य आपण या अगोदरच्या भागात बघितलेले आहे. या अनुच्छेद-६ च्या सुरवातीलाच पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या व्यक्तींना अनुच्छेद-५ मध्ये असलेल्या नागरिकत्वाबाबतच्या तरतुदी लागू होणार नसल्याचा उल्लेख आहे.**

आणि म्हणूनच या अनुच्छेद-६ मध्येच तरतूद केल्याप्रमाणे पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून भारताच्या राज्यक्षेत्रात स्थलांतर करून आलेल्या व्यक्तींना भारतीय नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी दोन महत्त्वाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक होते. या दोन अटींपैकी पहिली अट ह्या अनुच्छेद-६ च्या खंड (क) मध्ये देण्यात आलेली होती. शिवाय ही अट अनिवार्य होती. काय होती ती अट ? तर ह्या खंड (क) नुसार पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून भारताच्या राज्यक्षेत्रात स्थलांतर करून आलेल्या व्यक्तीचा जन्म हा 'गव्हर्मेंट ऑफ इंडिया 1935' या कायद्यात त्यावेळी भारताचे जे राज्यक्षेत्र निश्चित केलेले होते, अशा भारताच्या राज्यक्षेत्रात झालेला असावा. आता १९३५ ला भारताची फाळणी वा तुकडे झालेले नव्हते. त्यामुळे तेव्हाचा भारत हा आता निर्माण झालेल्या पाकिस्तान व बांगलादेश यांच्यासह अखंड स्वरूपात होता. अशा अखंड भारतात त्या व्यक्तीचा जन्म झालेला असावा. जर त्या व्यक्तीचा जन्म अशा अखंड भारतात झालेला नसेल, तर त्या व्यक्तीच्या आई किंवा वडिलांपैकी किमान एकाचा तरी जन्म या अखंड भारतात झालेला असावा. आणि जर तेही नसेल, तर त्या व्यक्तीच्या आजी आजोबांपैकी अगदी मग ते आईकडील असो वा वडिलांकडील, यांपैकी एकाचा तरी जन्म या अखंड भारताच्या राज्यक्षेत्रात झालेला असावा. म्हणजेच थोडक्यात स्वतः ती व्यक्ती किंवा तिच्या माता-पित्यांपैकी किंवा आजी आजोबांपैकी कोणा एकाचा तरी जन्म १९३५ ला असलेल्या अखंड भारताच्या राज्यक्षेत्रात झालेला असेल, तरच भारतीय नागरिकत्व मिळवण्यासाठी असलेल्या दोन अटींपैकी अनिवार्य असलेली एक अट पूर्ण होणार होती.

जन्मावर आधारित या पहिल्या अनिवार्य अटी सोबत अनुच्छेद-६ च्या खंड (ख) मध्ये दोन अटी देण्यात आलेल्या आहेत. या दोन पैकी कोणतीही एक अट पूर्ण केल्यास, अशा व्यक्तीला भारताचे नागरिकत्व संविधानाच्या प्रारंभी दिले जाणार होते. आता या खंड (ख) मध्ये नेमक्या कोणत्या दोन अटी देण्यात आलेल्या आहेत, ते आपण पाहूया.




खंड (ख) च्या कायदेशीर वाक्यावर नजर टाकल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, या खंडात १९ जुलै १९४८ या तारखेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या तारखेला घेऊनच खंड (ख) मध्ये एक सीमारेषा आखण्यात आलेली आहे. खंड (ख) च्या उपखंड (एक) मध्ये देण्यात आलेल्या पहिल्या अटीनुसार, पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून स्थलांतर करून आलेली व्यक्ती, जर १९ जुलै १९४८ पूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात आलेली असेल, तर त्या व्यक्तीला भारताची नागरिक मानली जाईल. म्हणजेच अनुच्छेद-६ च्या खंड (क) मध्ये देण्यात आलेली जन्माधारित पहिल्या अटीसोबतच, जर ती व्यक्ती १९ जुलै १९४८ च्या अगोदर पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून भारतात स्थलांतर करून आलेली असेल, तर ती व्यक्ती संविधानाच्या प्रारंभी भारताची नागरिक मानली जाईल.

आता हे झाले १९ जुलै १९४८ च्या पूर्वी आलेल्या स्थलांतरित व्यक्तींबाबत! पण जर एखादी व्यक्ती १९ जुलै १९४८ या दिवशी वा या दिवसानंतर पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून स्थलांतर करून भारतात आली असेल तर ? या प्रश्नाचे उत्तर या खंड (ख) च्या उपखंड (दोन) मध्ये देण्यात आले आहे. ह्या उपखंड (दोन) मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीप्रमाणे, जर ती व्यक्ती १९ जुलै १९४८ या दिवशी वा या दिवसानंतर स्थलांतर करून भारतात आली असेल, तर अशा व्यक्तीला त्यावेळी अस्तित्वात असलेल्या 'डोमिनियन ऑफ इंडियाच्या सरकार'ने नागरिकतेबाबत नोंदणी करून घेण्यासाठी जो अधिकारी वर्ग नियुक्त केलेला आहे, त्या अधिकाऱ्याकडे नागरिकता मिळवण्यासाठीचा एक अर्ज करावा लागणार होता. परंतु हा अर्ज भारत सरकारने ठरवून दिलेल्या नमुन्यात आणि निश्चित केलेल्या पद्धतीनुसारच करावा लागणार होता. सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने जर त्या व्यक्तीची भारताची नागरिक म्हणून नोंदणी केलेली असेल, तरच त्या व्यक्तीला संविधानाच्या प्रारंभी आपल्या देशाचे नागरिक मानले जाणार होते. परंतु इथे सुद्धा अनुच्छेद-६ च्या खंड (क) मध्ये देण्यात आलेली जन्माची अनिवार्य असलेली अट पूर्ण करणे गरजेचे होते. यासोबतच आणखी एक महत्त्वाची अट ठेवण्यात आलेली होती आणि ती म्हणजे, भारत सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे नोंदणी करण्याच्या दिनांकापुर्वी किमान सहा महिने तरी त्या व्यक्तीचे भारताच्या राज्यक्षेत्रात निवास असणे गरजेचे होते. तरच त्या व्यक्तीला अशा प्रकारचा अर्ज त्या अधिकाऱ्याकडे करता येणार होता.

# रमाईला वाचून रडायचे नाही, लढायचे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**रमाई अर्थात संघर्ष व त्याचे प्रतीक. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनातील सर्वात मोठा आधार म्हणजे रमाई. रमाई हे नाव नाही तर संघर्ष आणि त्यागातून जनकल्याण कसे साधता येते याची व्यवस्था म्हणजे रमाई होय. काबाड कष्ट करून, कुटूंबाची जबाबदारी स्विकारून कुटुंबाच्या सुखासाठी झटत राहणे. कुटुंबातील अनेक सदस्यांचे मृत्यू स्वतः च्या डोळ्यांनी बघणे, आणि नवरा काही तरी चांगले काम करतोय, त्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नाही म्हणून स्वतः ची मुले स्वतः च्या हाताने मातीत गाडून करोडो मुलांचे जिवन उज्वल करणारी रमाईचे मन असेल तरी केवढे याचा विचारही करू शकत नाही.**

जगातील सर्वात विद्वान व्यक्तीची बायको, आमदार, बॅरिस्टर यांची बायको, ज्यांना भेटायला राजर्षी शाहु महाराज चाळीत भेटायला येतात अशा गुणवान व्यक्तीची बायको, निरक्षर होती पण अशिक्षित नव्हती. विषमतेचे चटके हा समाज सहन करतोय, आणि यातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेब शिकत आहेत, मेहनत घेत आहेत म्हणून रमाईने स्वतःच्या इच्छा मारल्या, गौऱ्या थापून घर चालविले, त्यातून उरलेल्या पैसे बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामी येतील म्हणून जपुन ठेवून बाबासाहेब आंबेडकर यांना दिले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पैसे कमावायला लागल्या नंतरही कोणताही हट्ट न करता बाबासाहेब आंबेडकर यांना बळ देण्याचे काम रमाईने केले. समाईचा एकुणच संघर्ष, त्याग आणि समजूतदार पणा बघुन आजही आपल्या डोळ्यात पाणी येते. आयुष्य भर अत्यंत आर्थिक गरीबीमध्ये जिवन जगणाऱ्या रमाईच्या मनाची श्रीमंती आपण कोणत्याही मापात मोजली जाऊ शकत नाही. म्हणून स्वतः च्या अंगावर साधे लुगडे, गळ्यात काळा मनी यातच जिवन काढलेल्या रमाई मुळे करोडो महिलांच्या अंगावर हजारो रुपयांची साडी आणि आणि सोन्याच्या ताईत रमाई बसली हे केवळ आणि केवळ रमाईचा त्याग, संघर्ष व बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती असलेला विश्वास. वरिल सर्व गोष्टी सर्वांना माहिती आहेत. रमाईचा त्याग, त्यांनी कसे जिवन जगले, बाबासाहेब यांच्या पाठीशी कशा उभ्या राहील्या, बाबासाहेब आंबेडकर यांच्या आधार कशा झाल्या, आणि रमाईने जर बाबासाहेब आंबेडकर यांना थोडे जरी अडवले असते तर कदाचित बाबासाहेब आंबेडकर यांनी ठरलेले ध्येय पुर्ण झाले नसते. यातून आपल्या लक्षात येते कि रमाई अडाणी असली तरीही तिच्या ऐवढे जाणकार,. सुशिक्षित व समजदार आज कोणी असेल ? हा खुप मोठा प्रश्न आहे. रमाईचा संघर्ष व त्याग बघुन रडू येते हे साहजिकच आहे. परंतु फक्त रडल्याने रमाईला आपण मानतो किंवा रमाई समजली असे मुळीच नाही. रमाईने संघर्ष व त्याग कशासाठी केला तर देशातील करोडो लोकांना समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय मिळावा, माणसिक गुलामी तोडून प्रत्येकाला मान सन्मान स्वाभिमान मिळून माणसाला माणसाची वागणूक मिळावी. विषमेतेची व अस्पृश्यतेची व्यवस्था नष्ट करून समता प्रस्थापित होऊन प्रत्येकाला आदर्श जगण्याचा अधिकार मिळावा आणि करोडो लोकांच्या उद्धाराचे द्वार उघडून तेथे प्रत्येकाला जाण्याची संधी मिळावी म्हणून रमाईने संघर्ष केला, त्याग केला. परंतु मुख्य मुद्दा हा आहे की, रमाईच्या त्याग,.संघर्षाच्या मुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जे काही निर्माण करून ठेवले. सोन्याचे दिवस आपल्याला मिळाले, हक्क अधिकार मिळाले ते आज संरक्षित आहेत का ? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहून दिली आणि घटना कोणीच बदलु शकत नाही असे जर वाटत असेल तर आपण गुलामीगीरीमध्ये फसलो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. चार मुल त्यागुन, स्वतः उपाशी राहुन, स्वतः च्या पगारातील पैसा लोकांच्या हितासाठी खर्च करून उभी केलेली व्यवस्थेला सुरूंग लागत आहे. रमाई अडाणी असताना समतावादी व्यवस्था निर्माण करायला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना सर्वोतोपरी सहकार्य केले. त्याचमुळे बाबासाहेब आंबेडकर हि एवढी मोठी व्यवस्था निर्माण करून हजारो वर्षापासून चालत आलेली गुलामगिरी व विषमता नष्ट करून हक्क अधिकार बहाल करून माणसाला माणुस बनवले. आणि आज तीच व्यवस्था नष्ट करण्यासाठी शत्रु रांत्रदिवस प्रयत्न करत आहेत. आणि आजच्या शिकलेल्या स्त्रिया, नोकरदार स्त्रिया, नोकरी वाल्यांच्या स्त्रिया पैशाच्या जोरावर आम्हाला आज कोणतीच समस्या नाही असे समजत आहेत. हे सुद्धां गुलामीचेच लक्षण आहे. बाबासाहेब आंबेडकर यांना १९२२ नंतर कोणतीही वैयक्तिक अडचण नव्हती, पैसा, नोकरी मानसन्मान सर्व गोष्टी होत्या. तरीही ते लढले करोडो लोकांचे कल्याण केले तेच बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले काम आज धोक्यात आहे. संविधान धोक्यात आहे, शिक्षण, आरक्षण व नोकरी धोक्यात आहे. आमचे हक्क अधिकार धोक्यात आहेत. आणि हे सर्व वाचवण्यासाठी महिलांनी लढणे आवश्यक आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचीही ईच्छा होती महिलांनी आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी होणे आवश्यक आहे.



मोफत व सक्तीचे शिक्षणाची तरतूद असताना लाखों करोडो रुपये शिक्षणावर खर्च होत आहेत. लाखो करोडो रुपये खर्च करून नोकरी नाही मग शिक्षण कशासाठी ? हा प्रश्न उपस्थित होऊन बरेच लोक शिक्षणापासून दुर जातील. म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा अधिकार आपोआप बंद होईल. नोकरीचे खाजगीकरण करून आरक्षण व नोकरी संपवली आहे. खाजगीकरणामध्ये समोरच्या व्यक्तीची इच्छा असेपर्यंत आपण नोकरी करू शकू. ना पेन्शन ना कामाची शाश्वती ना इतर सुखसुविधा. म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांनी नोकरी,पेन्शन इतर लाभाची गॅरंटी संविधानाच्या माध्यमातून दिली ते ही गेले. आणि खाजगीकरणामध्ये आरक्षण नसल्याने उच्च पदे हे उच्च वर्णीय लोकांकडे जातील व चतुर्थ श्रेणी आपल्या कडे येईल म्हणजे पुन्हा आधुनिक मनुस्मृतीच लागु होईल. धर्माच्या नावाखाली पाखंड, अंधश्रद्धा, बुवाबाजी खुलेआम सुरू आहे, त्याला सरकार संरक्षण देत आहे. परंतु पाखंड, अंधश्रद्धा, बुआबाजी कायद्याने बंद असूनही त्याविरोधात बोलणाऱ्यांवर कारवाई केली जाते, बऱ्याच वेळा धर्मांध लोकांकडु धमक्या मिळतात म्हणजे आमचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आहे. त्यांचे ते तर्क, पुरावा नसलेले, काल्पनिक अज्ञान पसरवत आहेत आणि आमच्या कडे पुरावे, तर्क व सत्य बाजु असूनही आम्ही ते छातीठोकपणे सांगु शकत नाही हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिराऊन घेतल्याचे लक्षण नाही तर काय आहे ? इतर धर्माच्या धार्मीक भावना दुखवू नाही म्हणून देव अंधश्रद्धा यावर न बोलण्याचे सल्ले दिले जातात, यावेळी आम्ही हेच विसरून जातो आमचाही धम्म आहे. तो विज्ञानावर आधारित आहे, कोणत्याही प्रकारच्या काल्पनीक कथांवर वा दैवशक्ती वर अवलंबून नाही असा आमचा धम्म अंधश्रद्धा, दैविशक्ती व इतर थोतांड नाकारतो परंतु इतर धर्माचे लोक जेव्हा देवाला सार्वजनिक करतात, सरकारी कामामध्ये देव, अंधश्रद्धा, पाखंड आणतात तेव्हा आमच्या ही भावना दुखतात याचा विचार कोणी करतो का ? काल्पनिक गोष्टी मानणाऱ्यांनाच भावना आहेत आणि सत्य माणणाऱ्यांच्या भावनेचा विचार होणार की नाही ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आणि याचे कारण आहे, आम्ही रमाईचा इतिहास वाचून, बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची जाणीव न ठेवता कोणताही एकत्रितपणे लढा उभा न करता भौतिक सुखामध्ये गुरफटून गेलो. आम्हाला काहीच समस्या नाहीत या भ्रमात राहून पुन्हा सर्वांसाठी समस्या निर्माण झाल्या. भिमजयंती, रमाई जयंती फक्त साजरी करून त्यांचे विचार सांगणे आज महत्त्वाचे नाही तर त्यांचा लढा मजबूत करणे महत्त्वाचे आहे. आंबेडकरवादी विचाराच्या नावाखाली स्वतः चे पोट भरणाऱ्यांना एकाछता खाली आणुन आपल्या लढणे आवश्यक आहे. मीच नेता, मीच विचारवंत ह्या गोष्टी बाजूला सारून बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी म्हणून काम करने आवश्यक आहे. आपल्या कामावर जनता ठरवेल कोण नेता आणि कोण विचारवंत. स्वतः स्वतः ची पाठ थोपटने, प्रस्थापितांची लाचारी करून दोन पैसे मिळतील म्हणून हातमिळवणी करणे, आंबेडकरवादी विचारांचा लिलाव करणे हे थांबले पाहून. स्वतः ला बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी समजून शत्रुसमोर नतमस्तक होऊन लाचारी करणारा बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी असुच शकत नाही. कारण आजचे हे सोन्याचे मानासन्माचे दिवस बघण्यासाठी किती मोठा संघर्ष व त्याग आहे याची जाणीव आपल्याला राहली नाही. चार मुल समाजासाठी गमावलेल्या रमाईचे मन कुठे असेल. आपल्या बाळाला थोडा ताप जरी आला तर चांगल्या दवाखान्यात उसने पेसे घेऊन आपण दाखल करतो. जोपर्यंत बाळाला बरे वाटतं नाही तोपर्यंत आईला चैन पडत नाही. मग थोडा विचार करा रमाईने काय आणि कसे भोगले असेल ? म्हणून रमाईच्या संघर्ष व त्यागाला खरचं नमन करायचे असेल तर एकीकरणासाठी, संविधानाच्या संरक्षणासाठी, हक्क अधिकारासाठी, नेतेगीरी, मी पणा मातीत गाडून समतेचा व न्यायाचा लढा उभा करणे आवश्यक आहे. आणि यामध्ये महिलांनी पुढाकार घेतला तर लढा लवकर उभा राहील आणि खऱ्या अर्थाने रमाईला तिच सर्वात मोठी आदरांजली ठरेल.

करोडो मुलांची आई रमाई यांच्या स्मृतीदिना निमित्त रमाई च्या त्यागाला, संघर्षाला व समजूतदार पणाला विनम्र अभिवादन..

# कृत्रिम बुद्धीमत्ता प्रेरित शिक्षण देणारे पहिले विद्यापीठ गेम चेंजर ठरणार!

आधुनिक केसरी

देशातील पहिले 'एआय' विद्यापीठ १ ऑगस्टपासून कर्जतमध्ये सुरु होणार आहे. आर्टिफिशिअल इंटिलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धीमत्ता प्रेरित शिक्षण देणारे हे भारतातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. महाराष्ट्र सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याने आर्टिफिशिअल इंटिलिजन्स विद्यापीठाला मंजुरी दिली आहे.एआय प्रेरित शिक्षणाला समर्पित पहिले विद्यापीठ म्हणून नवीन युनिव्हर्सल एआय विद्यापीठ, आर्टिफिशिअल इंटिलिजन्सच्या क्षेत्रातील खास विकसित करण्यात आलेले अभ्यासक्रम देऊ करेल. तसेच लिबरल आर्ट्स व ह्युमॅनिटीज, ग्लोबल अफेअर्स व डिप्लोमसी, कायदा, पर्यावरण व शाश्वतता आणि क्रिडी विज्ञान आदी विषयांवरील आधुनिक अभ्यासक्रमही तयार केले आहेत. २१ व्या शतकातील सार्वत्रिक कौशल्यांचे शिक्षण देणारे भारतातील व महाराष्ट्रातील पहिले समर्पित एआय विद्यापीठ देशाच्या व राज्याच्या वाढ आणि विकासातील एक महत्वपूर्ण प्रेरक घटक ठरणार आहे. विद्यापीठासाठी रायगड जिल्ह्यातील कर्जतमध्ये ग्रीन कॅम्पस तयार केला आहे. या विद्यापीठात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. १ ऑगस्टपासून पहिले शैक्षणिक वर्ष सुरु होणार आहे.

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगाव !**

विद्यापीठाने एआय आणि फ्युचर टेक्नॉलॉजीतील पदवी आणि विशेष पदव्युत्तर अभ्यासक्रम विकसित केला आहे त्यामूळे आगामी काळात हे विद्यापीठ गेम चेंजर ठरणारं हे मात्र नक्की !!



# जिंतूर समिती सभापतीपदी गंगाधर बोर्डीकर तर उपसभापती सुंदर चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**बी.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी भाजपचे गंगाधर बोर्डीकर आणि उपसभापतीपदी सुंदर चव्हाण यांची निवड करण्यात आली. प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक निबंधक एम.ए.भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी बाजार समितीच्या सभागृहात नवनिर्वाचित अठरा संचालकांची विशेष बैठक घेण्यात आली. यात सभापतीपदाकरिता गंगाधर बोर्डीकर यांचा आणि महाविकास आघाडीचे मनोज थिटे यांचे नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. छाननीत दोन्ही अर्ज वैध ठरले. त्यामुळे सभापतीपदासाठी निवडणूक घेण्यात आली. यात गंगाधर बोर्डीकर यांना चौदा व मनोज थिटे यांना चार मते मिळाली.तर उपसभापतीदासाठी सुंदर चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखल झाला असल्याने त्यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली. आजच्या बैठकीत भाजपच्या बोर्डीकर गटाचे चौदा आणि महाविकास आघाडीचे चार असे सर्व संचालक उपस्थित होते. या निवडणुक प्रक्रियेत प्राधिकृत अधिकारी भोसले यांना संस्थेचे सचिव सतीश काळे, सहायक सहकार अधिकारी मनमितसिंग, सहसचिव जी. के. हरगावकर यांनी सहकार्य केले. निवडणुकीनंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करत नवनिर्वाचित सभापती, उपसभापती यांची ढोलताशांच्या गजरात शहरातील नगरेश्वर मंदिराच्या सभामंडपा पर्यंत विजयी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी व्यापाऱ्यांसह विविध क्षेत्रातील नागरिकांनी सभापती व उपसभापती यांचे पुष्पहार घालून अभिनंदन केले.

# पृथ्वी फाउंडेशनचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या नामांकित व्यक्तींना यावर्षीपासून पृथ्वी फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येत आहेत. शुक्रवार दि. 26 मे रोजी सकाळी अकरा वाजता नगरमधील माऊली संकुल येथे पुरस्काराचे वितरण होणार आहे. तसेच, केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेले महारुद्र जगन्नाथ भोर यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती पृथ्वी फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. अमोल सायंबर यांनी दिली

पृथ्वी फाउंडेशन गेल्या काही वर्षांपासून अहमदनगर व बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवित आहे. पृथ्वी फाउंडेशनतर्फे विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा यथोचित गौरव करावा, असा मनोदय विश्वस्तांनी व्यक्त केला होता. त्यानुसार शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रा. डॉ सज्जन गायकवाड, डॉ नारायण गवळी व श्री हरिश्चंद्र दळवी सर यांना राष्ट्रीय निर्माता पुरस्कार देण्यात येत आहे. जलसंधारण व पर्यावरण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल मा. डॉ रामकृष्ण बोडके यांना पर्यावरण मित्र पुरस्कार देण्यात येत आहे. दैनिक पुढारीचे उपसंपादक डॉ. सूर्यकांत वरकड यांना शोध पत्रकारिता पुरस्कार देऊन व कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्कार तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री समाधान सोळंके यांना सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श गाव प्रकल्प व कार्य समितीचे प्रमुख पोपटराव पवार, माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक लोक आवाजचे संपादक विठ्ठल लांडगे असतील.

दरम्यान, यूपीएससी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेले महारुद्र जगन्नाथ भोर यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# पाणीपुरवठा योजनेसाठी ४ कोटी ९२ लाखांची योजना मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** तालुक्यातील जवळा नळ पाणी पुरवठा योजनेस मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग पुणे, यांचेकडून ४.९२ कोटीच्या कामास तत्वता मंजूरी मिळालेली आहे. आज सकाळी मा. मुख्य अभियंता यांनी सादरीकरणाचे अवलोकन करून या योजनेस तत्काळ मंजूरी दिली आहे. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत जवळा नळ पाणीपुरवठा योजना मंजूरीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रापापु उपविभाग सांगोला चे उपअभियंता सुरेश कमळे, व प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी विशेष परिश्रम घेतले. आमदार शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखेपाटील यांनी दिलीप स्वामी, सुरेश कमळे व सुनील कटकधोंड यांचे विशेष कौतुक केले आहे. या जलजीवन मिशन योजनेचा फायदा जवळे गाव, धुमाळवाडी ,बर्वे वस्ती, अंबिका नगर, मेटकरी वस्ती यासह इतर पाच वस्त्यांना या योजनेचा फायदा होणार आहे सदरच्या योजनेस तत्वतः मंजुरी मिळाल्यामुळे जवळा गावासह इतर वाडी वस्तीवरील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीस वर्षा पर्यंत मिटणार आहे, त्यामुळे लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे.



# लोणंदच्या श्री मयूरेश्वर पतसंस्थेच्या निवडी जाहीर

## चेअरमनपदी मोहन कुंभार व व्हाईस चेअरमनपदी निमेश रावळ

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ता.खंडाळा येथील श्री मयुरेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी मोहन कुंभार यांची तर व्हाईस चेअरमनपदी निमेश रावळ यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. लोणंद येथील मयुरेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच संपन्न झाली. संचालक म्हणून अँड.गणपतराव शेळके मोहन कुंभार अमोल शेळके, बाळासो रासकर, सुकलाल भोई, अविनाश गायकवाड़, संजयकुमार बनसोडे, प्रमोद कुंभार, निमेश रावळ, निलेश मोरे, अतुल शेळके, रुपाली शिंदे, स्वाती येळे यांची निवड झाली आहे. मयुरेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये संस्थेच्या चेअरमनपदी मोहन कुंभार, व्हाईस चेअरमनपदी निमेश रावळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्ञानेश्वर चव्हाण यांनी काम पाहिले त्यांना सचिव रुपाली गोरे, राहुल परदेशी, उत्तम शिंदे यांनी सहकार्य केले. पतसंस्थेच्या नवनिर्वाचित चेअरमन, व्हाईस चेअरमन यांचे अॅड. सदाशिव शेळके, वसंतकुमार रावळ, सत्वशिल शेळके, म्हस्कू आण्णा शेळके, हरिष सुतारिया, वसंत पेटकर, अशोकराव जाधव, छाया जाधव,शेखर काळे, किशोर पवार, मनोज गायकवाड, प्रकाश ननावरे, दिनेश कुंभार, शशांक फाटक, विठ्ठल भिसे, समीर बागवान तसेच सहकार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, संस्थेचे सभासद ठेवीदार व लोणंद पंचक्रोशितील ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



# मार्तंड देवसंस्थान विश्वस्त निवडीचा वाद पेटला

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** राज्याचे लक्षवेधी कुलदैवत तीर्थक्षेत्र जेजुरीच्या मार्तंड देवसंस्थान नवनिर्वाचित ट्रस्टी निवड संदर्भात समस्त जेजुरीकरांनी विरोध दर्शवीत राज्याच्या मुख्यउपमुख्य मंत्री यांना चक्क पोस्टाने बेलभंडारा पाठवून सदर कमिटी बरखास्त करून धर्मदाय आयुक्ताचा निषेध देखील दर्शवीला आहें शुक्रवारी सकाळी घोषणा देत जेजुरी ग्रामस्थ आणि सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या निवडी विरोधात जाहीर घोषणा देत निषेध व्यक्त केला आहे. चक्री उपोषणाद्वारे न्याय मिळेपर्यंत विरोध कायम ठेवला असूनजेजुरी बाहेरील विश्वस्तांना काम करू न दवण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला या प्रसंगी राज्याचे मुख्यउपमुख्य मंत्र्यांना थेट खंडोबाचा बेलभंडारा पोस्टाने पाठवीत सदर ट्रस्टी बरखास्त करून ग्रामस्थांची ट्रस्ट निवडची असावेत असे साकडे घातले आहें जेजुरी, दि.२६ ( वार्ताहर ) महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीच्या खंडेरायाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या मार्तंड देवसंस्थान समितीवरील विश्वस्त निवडीचा वाद चिघळला असून नवनियुक्त विश्वस्त मंडळ निवड प्रक्रियेचा निषेध करत ... राजकीय हस्तक्षेप होत निवड झालेले विश्वस्त मंडळ बरखास्त करा.आणि प्राधान्याने स्थानिक जेजुरीकर ग्रामस्थांमधील सामाजिक कार्यकते व अभ्यासू व्यक्तींची निवड करा .अशी मागणी सर्वपक्षीय पदाधिकारी व ग्रामस्थांनी गुरुवारी( दि.२५ )मल्हार गौतमेश्वर छत्री मंदिर येथे घेण्यात आलेल्या बैठकीत केली. यावेळी जेजुरी शहरातील दोन विश्वस्त निवडीचे स्वागतही करण्यात आले. शुक्रवारी ( दि.२६ )सकाळी १० वा. छत्रपती शिवाजी महाराज चौकात निषेध सभेचे आयोजन करण्यात आले.यावेळी खांदेकरी मानकरी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, प्रमुख वतनदार राजेंद्र पेशवे, सचिन पेशवे अजिंक्य देशमुख, १२बलुतेदार संघाचे अध्यक्ष सचिन खोमणे, माजी विरोधी पक्षनेते जयदीप बारभाई, माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, माजी विश्वस्त संदीप जगताप, शिवराज झगडे, पंकज निकुडे, सुधीर गोडसे, अविनाश भालेराव, ॲड. अशोक भोसले ॲड. मंगेश जेजुरीकर, कृष्णा कुदळे, सुशील राऊत, दिलावर मनेर, राजेंद्र मोरे, नंदू निरगुडे, दिगंबर उबाळे, उमेश जगताप, प्रसाद अत्रे, अलका शिंदे, गणेश आगलावे, रोहिदास जगताप, निलेश जगताप, प्रकाश खाडे, मेहबूब पानसरे, बंटी खान ,माधव बारभाई , विठ्ठल सोनवणे, प्रशांत लाखे, एन .डी. जगताप आदींसह सर्वपक्षीय पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# लोणंदच्या इनोव्हेरा करियर अकॅडमीकडून पोलीस भरतीतील गुणवंतांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** मुंबई पोलीस भरतीत यशस्वीरित्या यश संपादन करून भरती झालेल्या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम लोणंद ता.खंडाळा येथील इनोव्हेरा करिअर अकॅडमीच्या वतीने घेण्यात आला.हा सत्कार जेष्ठ नेते व सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

धुळा कराडे, संदेश देडे, भगवान धायगुडे, प्रशांत चव्हाण,आकाश शिंदे आदींचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी इनोव्हेरा करिअर अकॅडमीचे संचालक किरण जाधव, संचालक गिरीश बनकर, दुर्वांकुर हॉटेलचे प्रमुख व संचालक, शुभम नेवसे, किरण गोरे, प्रतिक नेवसे व अकॅडमीतील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना आनंदराव शेळके पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. पोलीस भरतीमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचं अभिनंदन करताना त्यांनी सामाजिक नितिमूल्यांची व विशेष करून प्रामाणिक सेवेची बहुमोल शिकवण आपल्या मार्गदर्शनातुन दिली. यावेळी त्यांनी आपल्या कॉलेज जीवनातील काही रंजक गोष्टींना उजाळा दिला बरोबरच आपलं राजकीय,सामाजिक कारकिर्दीतील प्रामाणिक व कर्तव्य कठोरपणाची आठवण उपस्थितांना करून देत असताना उपस्थितांची अक्षरशः मने जिंकली. यशस्वी विद्यार्थ्यांनी सुद्धा मनोगते व्यक्त केली. धुळा कराडे यांनी तब्बल १७ वर्ष भारतीय सैन्य दलात सेवा दिल्या नंतर हीं पुनःश्च पोलीस भरती होऊन देशाप्रति अनन्य साधारण प्रेम भावना आपल्या कर्तव्यप्रति व्यक्त करून देत आजमितीला एक वेगळा आदर्श उभारण्याचं काम केलं आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविताना आम्हाला मनस्वी आनंद होत असल्याची भावना संचालक गिरीश बनकर यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण जाधव तर सूत्रसंचालन गिरीश बनकर यांनी केले.



# कु. पायल राम बनसोड बारावी परीक्षेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील येथील कै. राधाबाई वं. वानखेडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा वर्ग १२ वी निकाल ९८.६४ % लागला असून. गुणानुक्रमे कु. बनसोड पायल राम ७७.६५% प्रथम तर 2 ) कु. वाघ गायत्री त्र्यंबक ७७% द्वितीय यांनी गुण संपादन केले आहे.

कु. तावरे पायल कचरू ७४% तृतीय विद्यालयाचे एकूण ७४ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचि श्री. भोईदेव शिक्षण संस्था फुलंबीच्या अध्यक्षा श्रीमती. चंद्रकलाबाई वानखेडे, सचिव श्री. विजय वानखेडे, मुख्याध्यापक श्री. शफिक शेख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. यावेळी सर्व स्तरावरुन प्रथम क्रमाक येणारी पायाल बनसोड या विद्यार्थीनीला मा. केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे व फुलंब्री नगराध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ, सभापती अनुराधा ताई चव्हाण, जितेंद्र बाबा जयस्वाल, शिवाजी पार्थीकर, गजानन नागरे ,योगेश मिसाळ, शालेय समिती अध्यक्ष आवेज चिस्ती, सुमित प्रधान सुनील शेवाळे, कृष्णा पात्रे, अजय शेरकर, वाल्मीक जाधव, अकबर पटेल, एकनाथ ढोके, किसन गुंजाळ, गणेश राऊत, मोबीन शहा, कैसर पटेल, गणेश तारू, राम हापत, संतोष जाधव, सचिन शेरकर, नागेश भारद्वाज, नवनाथ शेवाळे, संतोष आघाडे, चंदू राऊत, सुनील शेरकर, नंदू राऊत आद्यी भाजपा कार्यकर्त व शिक्षक, कर्मचारी सर्व स्तरावरुन शुभेच्छा देण्यात आल्या.

# महेश स्तंभ, महेश चौकाचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पैठणच्या माहेश्वरी समाजाच्या आग्रहाने मंजूर झालेल्या पाचोड नाका,पैठण येथे अतिशय सुंदर व भव्य दिव्य अशा महेश स्तंभ व महेश चौकाचे लोकार्पण छत्रपती संभाजीनगर जिल्हयाचे पालकमंत्री तथा पैठणचे आमदार संदीपानजी भुमरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात दि.25 वार गुरुवार रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाला व्यासपीठावर महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी महासभा अध्यक्ष मधुसूदनजी गांधी, महामंत्री सत्यनारायणजी सारडा, प्रदेश उपाध्यक्ष दिनेश सोमाणी, जिल्हाध्यक्ष शामसुंदरजी सोमणी, राजस्थान मंडळ अध्यक्ष सुनीलकुमार बलदवा, अखिल भारतीय माहेश्वरी महासभा सदस्य नंदलाल लाहोटी, संजय पापडीवाल, माहेश्वरी सभा जिल्हा उपाध्यक्ष सचिन लाखोटीया, तालुका अध्यक्ष राधाकीसन लोहिया, पैठण व्यापारी महासंघ अध्यक्ष पवन लोहिया यांची प्रमुख उपस्थिती होती. या लोकार्पण प्रसंगी भुमरे यांनी सांगितले पैठणच्या माहेश्वरी समाजानी शहरात मागणी केली त्यानुसार पाचोड नाका येथे ३०



लाखाचा निधी खर्चुन एक सुंदर महेश स्तंभ उभारला आहे. या स्तंभाचा लोगो ,कलाकृती महाराष्ट्र नव्हे तर देशातील एक नंबरचा आहे असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. प्रारंभी जिल्हाध्यक्ष श्री सोमाणी यांनी असाच एक स्तंभ छत्रपती संभाजीनगरला करावा अशी आग्रही मागणी त्यांनी आपल्या भाषणातून केली. पालकमंत्री श्री भुमरे साहेब यांनी त्वरित तुम्ही जागा पाहा मी असाच स्तंभ तुम्हाला मंजूर करतो असे आश्वासीत केले.

प्रदेश अध्यक्ष मधुसूदनजी गांधी यांनी पल्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना एक मागणी केली की समाजाला माहेश्वरी ही ओळख शासन दरबारी मिळवून देण्यासाठी कॅबिनेट मंत्री भुमरे साहेब यांनी पुढाकार घ्यावा आणि भुमरे यांनी सुद्धा आपल्या भाषणात शासन स्तरावर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सोबत चर्चा करून लवकरच एक समाजाची शिष्टमंडळाची बैठक लावून यावर चर्चा करू असे आश्वासन दिले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती विलास बापू भुमरे, दुध संघाचे संचालक नंदलाल काळे, राजस्थान मंडळ अध्यक्ष सुनीलकुमार बलदवा, भाजपाच्या महिला प्रदेशच्या रेखाताई कुलकर्णी, नगराध्यक्ष सुरज लोळगे, दादा बारे, सोमनाथ परदेशी, भूषण कावसनकर,महेशचौक निर्माण समितीचे उमेश बाहेती, नाथप्रसाद पोरवाल, विजय पापडीवाल, संतोष मालपाणी, गणेश लोहिया, संजय सारडा, जुगलकिशोर लोहिया, बाळासाहेब मुंदडा, महेश बजाज, विष्णू काबरा,अशोककुमार चांडक,महेश मुंदडा, प्रकाश लोहिया,अशोक करवा,गोपाल लखोटिया, राजेश मानधने, अमित सोमानी, जगदीश नागोरी, बलराम लोळगे, बांधकाम विभागाचे उप अभियंता राजेंद्र बोरकर, अभियंता स्नेहा जनगावे, माहेश्वरी समाज, महिला बांधवाची उपस्थिती होती. यावेळी राजेश्री बाहेती यांनी सुद्धा महिला मंडळाच्या वतीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय पोरवाल व सूत्रसंचालन नंदकिशोरजी मालपाणी यांनी केले.

# ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींनी मारली बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ( ताः खुलताबाद ) येथील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९७.२७% टक्के लागला त्यामुळे विद्यार्थी पालक संस्थाप्रमुख प्राध्यापक प्राचार्य यांच्यात आनंदाचे वातावरण आहे. तीनही शाखेत मुलींनीच प्रथम येण्याचा बहुमान मिळवल्याने आनंदी वातावरण आहे. विज्ञान शाखेचा निकाल 99.34% एवढा असून आकांक्षा किशोर गिरी हिने 600 पैकी 467 गुण मिळवले त्यामुळे ती 77.83% टक्के गुण मिळवून प्रथम आली. वाणिज्य शाखेचा निकाल 99.92% टक्के असून मयुरी राजेंद्र धुमाळ हिने 600 पैकी 502 गुण घेतले त्यामुळे ती 83.67% टक्के गुणांनी प्रथम आली. कला शाखेचा निकाल 88.73% टक्के असून पल्लवी भारत राठोड हिने सहाशे पैकी 454 गुण घेतले त्यामुळे ती 75.67% टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थाप्रमुख संस्था सचिव व प्राचार्य त्यांनी करून शुभेच्छा दिल्या भाऊसाहेब काळे योगेश झिंजुके तसेच पालक व विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्या.

# पर्यावरणपूरक जीवनपद्धती तालुकास्तरीय महिला कार्यशाळेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात व सोयगाव तालुक्यात पर्यावरण पूरक जीवन पद्धती अभियान अंतर्गत विशेष सप्ताह निमित्त तालुकास्तरीय महिला कार्यशाळा निमित्त शेतीतील नविन तंत्रज्ञानाचे धडे मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी ( पर्यावरण पूरक जीवन पद्धती अभियान ) यांची घोषणा केली हवामान बदलाच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्टय आहे. त्यानुसार सदरील अभियांनाचा सप्ताह संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक २२ मे २०२३ ते २८ मे २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे त्यानुसार कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आज दिनांक २५ मे २०२३ रोजी तालुकास्तरीय महिला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती यात प्रामुख्याने कार्यक्रमाची प्रस्तावना व बी. एफ व शून्य मशागत तंत्रज्ञान याविषयीची माहिती आर. जी. गुंडिले तालुका कृषि अधिकारी सोयगांव यांनी दिली. मूलस्थानी जलसंधारण व सूक्ष्म सिंचन याविषयीची माहिती के. पी. महाजन कृषि पर्यवेक्षक यांनी दिली. संरक्षित शेती शेडनेट व पॉलीहाऊस यांची माहिती ए. जे. पाटील कृषि पर्यवेक्षक यांनी दिली. बिजाप्रक्रिया व सद्य स्थितीत वापरवायचे वाण याविषयीची माहिती ए. एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी दिली. पिकांच्या विशिष्ट वाणांचा वापर याविषयी माहिती एच. बी. देशमुख कृषि पर्यवेक्षक यांनी दिली. आजच्या कार्यक्रमास प्रगतिशील महिला शेतकरी यांची उपस्थिती होती.





# गैरप्रकारे एन.ए.मंजुरी देणाऱ्यांची चौकशी करून कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** तहसील कार्यालयामार्फत 1 जानेवारी 2022 ते 28 फेब्रुवारी 2023 या कालावधी मध्ये अकृषिक सनद ( एन.ए. ) मंजुरी देण्यात आलेल्या अनेक प्रकरणात गैर प्रकार घडलेले आहे त्या संदर्भात सविस्तर चौकशी करुन संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्याची मागणी युवक काँग्रेसचे अंबड शहराध्यक्ष दीपक लोहकरे यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना केली आहे.

या संदर्भात तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात दिपक लोहकरे यांनी म्हटले की, मी माहिती अधिकारामार्फत अकृषिक सनद ( एन.ए. ) च्या फाईली मागवल्या होत्या त्या फाईली मिळाल्यानंतर त्या फाईलीचा अभ्यास केला असता 200 मिटरच्या आत गट क्र.बसत नसला तरी भुमिअभिलेख कार्यालयाकडून 200 मिटरच्या आत असल्याचे प्रमाणपत्र जोडून संबंधीत अधिकारी संगनमताने बोगस काम करत असल्याचे दिसून आले. त्यामुळे आपण माझ्या निवेदनाची त्वरित दखल घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात कडक कारवाई करावी, अशी मागणी लोहकरे यांनी सदर निवेदनात शेवटी केली आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# लोहा तालुक्यात महसूलमंत्र्यांच्या धोरणाला केराची टोपली

## गोदावरीतून अवैध वाळू उपसा सुरूच, वाळूमाफियांना मोकळे रान

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** तालुक्यात महसूल मंत्र्यांच्या धोरणाला केराची टोपली देत बेटसांगवी येथे गोदावरी नदी पात्रातून बेसुमार अवैध वाळू उपसा सुरू असुन महसूल विभाग मुग गिळून गप्प बसला आहे. सदरील वाळू घाटाची पाहणी पत्रकारांनी पाहणी केली असता येथे अवैधरित्या वाळू माफिया हे गुडगुडी व बिहारी मजुर लावून अनेक तराफेदवारे बेसुमार वाळू उपसा व वाहतूक करून शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवित आहेत.तेव्हा सदरील अवैध वाळू उपशाबदल उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक म्हणाले की मी रजेवर आहे लोहा तहसिलदार यांना कारवाई करण्याची सुचना देतो.लोहा तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही, तर तलाठी पाईकराव व मंडळ अधिकारी हे गावात मुख्यालयी राहत नाहीत वाळू माफियाची मिलीभगत करून त्यांनी अवैध वाळू उपसा व वाहातुकिला मोकळे रान सोडले आहे. शासनाची धोरणे कितीही चांगली असेल तरी त्यांची अमंलबजावणी योग्य प्रकारे होत नसेल व सरकारी नौकरवर्ग जर बिनकामी व भ्रष्ट असेल तर शासनाचे ध्येय धोरण निकामी ठरतात यांचा प्रत्यय लोहा तालुक्यात येत असुन राज्य सरकार मधील महसुलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राज्यातील वाळू माफियांच्या वाळू तस्करीला लगाम बसावा व सर्व सामान्य नागरिकांना माफक दरात ६०० रूपये प्रति ब्रास वाळू मिळावी म्हणून शासकीय अध्यादेश काढला असुन त्यांची अमंलबजावणी त्यांनी त्यांच्या हस्ते दि.१ मे रोजी अहमदनगर जिल्ह्यातुन केली पण लोहा तालुक्यात महसुल विभागाने या धोरणाची अद्याप पर्यंत अमंलबजावणी केली नसुन वाळू माफियांला मोकळेरान सोडले असुन यात लोहा तालुक्यातील गोदावरी नदीवरील एकाही वाळू घाटाचे टेंडर सुटले नसताना वाळू माफियांने बेटसांगवी येथील वाळू घाटातून बेसुमार अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरू केली असून याला आळा घालण्यास लोहा महसूल विभाग अपयशी ठरला असून कुंपणाने शेत खाल्ले अशी गत झाली आहे. तेव्हा याकडे जिल्हाधिकारी व विभागीय महसूल आयुक्त यांनी तत्काळ लक्ष देऊन






लोहा तालुक्यातील अवैध वाळू उपसा व वाहातूकिला आळा घालावा व नागरिकांना ६०० रूपये ब्रास ने वाळू उपलब्ध करून द्यावी अशी मागणी जनतेतून होत आहे. चौकटः- वाळू घाटांचा लिलाव झाला नसूनही, महसूल मंत्र्यांचे आदेश अशोक किंवा जिल्हाधिकाऱ्यांचे स्थानिक प्रशासनावर कसल्याही प्रकारचा असर होत नसून लोहा शहरातून व तालुक्यातून शेकडो हायवा अवैद्य मार्गाने रेतीची वाहतूक करीत आहेत.आज पर्यंत लोहा तालुक्यात व शहरात अवैद्य रेती वाहतुकीच्या गाडी मालकांची व चालकांची कमालीची शर्यत लागल्याचे दिसून येत आहे. या शर्यतीमुळे आजपर्यंत कित्येक मोटारसायकलधारक तथा पादचारी लोकांना आपले प्राण गमवावे लागले असून बऱ्याच जणांना अपंगत्व आले आहे. एवढे असूनही प्रशासन या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना पाच वर्षांचा कार्यअहवाल सुपूर्द

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** दि.२५ मे रोजी शिवतीर्थ येथे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठवाड्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जिल्हाध्यक्ष यांची बैठक बोलावली होती. यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष यांचे सविस्तर चर्चा करुन ऐकून घेतले. मराठवाड्यातील पक्षाची परिस्थिती जाणून घेतली. संभाव्य जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका महानगरपालिका निवडणुकी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. राजसाहेब बोलताना पुढे म्हणाले की चौक तिथे नाका, या नाक्याच्या माध्यमातून सामान्य जनतेचे कामे करा. नाक्यावर येताना तुमच्याकडे कोणीही मनात संकोच ठेवणार नाहीत म्हणून गावाच्या शहरातील व गावातील चौकात मनसेचा झेंडा लावून नाक्याच्या मार्फत पक्षाचे काम चालू करा, अशा प्रकारच्या सूचना पदाधिकाऱ्यांना दिल्या, पुढच्या महिन्यात मनसे अध्यक्ष राज साहेब मराठवाड्याच्या दौऱ्यावर येण्याचे संकेत मिळाले. मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी ५ वर्षाचा कार्य अहवाल राज साहेबांना दिला. या बैठकीला मराठवाड्यातील मनसे जिल्हाध्यक्ष, सुमित खांबेकर, वैभव मिटकर, दिलीप नाना बनकर, छत्रपती संभाजीनगर, प्रकाश सोळंके, गजानन गीते, रवी राऊत, बळीराम खटके, जालना, गणेश सुरवसे, रुपेश सोनटक्के, शेख राज, परभणी, राजेंद्र मोटे, सुमंत धस, श्रीराम बाधाडे बीड, राजेंद्र गपाट, आबासाहेब ढवळे, धाराशिव, डॉ नरसिंह भिकाने, शिवकुमार नागराळे हे जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

# वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर शेवगाव पोलिसांची कारवाई

## १५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** पोलिस स्टेशन हद्दीतील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर शेवगाव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करत तब्बल १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आज सोमवारी सकाळी ९:१० वाजता मुंडे चौक बोधेगाव येथे एक टाटा कंपनीचा पांढऱ्या रंगाचा एम एच क्रमांक ३२ क्यु ३७७२ डंपर रोडवरून जात असताना त्यास थांबविले असता डंपर चालकास ताब्यात घेऊन त्यांस नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव एकनाथ पांडुरंग मिसाळ वय ३४ वर्षे राहणार बोधेगाव तालुका शेवगाव असे सांगितले सदर डंपर चालकास वाळू वाहतूकीच्या परवाना बाबत माहिती विचारली असता त्यांच्याकडे कुठलाही परवाना आढळून आला नाही. सदर डंपर चालकाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर वाळू वाहतूक केली असल्याने शेवगाव पोलिस स्टेशन येथे सदर डंपर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच बुधवार दि .२४ रोजी भगतसिंग चौक शेवगाव या ठिकाणाहून टाटा कंपनीचा पांढऱ्या रंगाचा एम एच क्रमांक १७ ए जी ५०५० डंपर चालकास वाळू वाहतूक सदर डंपर चालकाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर वाळू वाहतूक केली असल्याने शेवगाव पोलिस स्टेशन येथे सदर डंपर चालकावर गुन्हा दाखल परवाना संदर्भात माहिती विचारली असता सदर डंपर चालकाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर वाळू वाहतूक केली असल्याने शेवगाव पोलिस स्टेशन येथे सदर डंपर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही कारवाईमध्ये तब्बल १५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कौतुकास्पद कामगिरी पोलीस अधीक्षक राकेश ओला सो ,मा. अप्पर पोलीस अधिक्षक सो प्रशांत खैरे साहेब, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी संदिप मिटके सो श्रीरामपूर विभाग चार्ज शेवगाव यांचे मार्गदर्शनाखाली शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी, सपोनि/आशिष शेळके, चापोना/ रविंद्र शेळके,चापोना/ बाळासाहेब नागरगोजे,पोकॉ/बप्पासाहेब धाकतोडे,पोकॉ/राहुल खेडकर यांनी सदरची कामगिरी केली आहे.



# नारेगावातील विजेच्या समस्या सोडवू

## अधीक्षक अभियंता जमधडे यांचे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नारेगाव परिसरातील विद्युत ग्राहकांच्या तक्रारी व समस्यांचे निराकरण केले जाईल, ग्राहकांनी थकबाकीसह चालू वीजबिले भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या औरंगाबाद शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे यांनी केले.

औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांच्या निर्देशानुसार मंगळवारी (25 मे) नारेगावात ग्राहक संवाद मेळावा घेण्यात आला. त्यावेळी जमधडे यांच्यासह शहर-2 विभागाचे कार्यकारी अभियंता महेश पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आंबेकर, चिकलठाणा उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर, चिकलठाणा एमआयडीसी शाखेचे सहायक अभियंता श्याम मोरे, सहायक लेखापाल आशिष खानापुरे यांच्यासह जनमित्र तसेच ग्राहक व ग्राहक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वीज खांब बसवावेत, शाखा कार्यालयात तक्रारवही ठेवावी, वाढती ग्राहक संख्या पाहता आणखी एक शाखा कार्यालय सुरू करावे, नवीन रोहित्र बसवावेत, वीजबिल दुरुस्त करावे, एरियल बंच केबल टाकावी, पावसाळ्यापूर्वी वीज वाहिन्यांना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडाव्यात, अशा मागण्या ग्राहकांनी केल्या.

यावर अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे यांनी नियमानुसार कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. एमआयडीसी शाखेसाठी अतिरिक्त कर्मचारी नेमले असून अनावश्यक वीजवापर टाळावा. वीज खंडितची तक्रार करताना वीजबिल भरलेले असावे. त्याचबरोबर नवीन रोहित्रासाठी नवीन जोडणीचे अर्ज जोडावेत. ग्राहकांनी वीजबिले नियमित भरावीत. वीजचोरी करू नये आणि कुणी वीजचोरी करत असेल तर त्यांची माहिती महावितरणला द्यावी, असेही जमधडे यांनी यावेळी सांगितले.

# वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या तीन हायवा चालकांविरुद्ध गुन्हा दाखल

## एकूण 55,60,000/- मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मनीष कलवानिया, पोलीस अधीक्षक यांनी जिल्हयातील अवैध व विनापरवाना बेकायदेशीरपणे चोरटी वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू माफिया विरुध्द कारवाईचा बडगा उगारत चोरटी वाळू वाहतूकीला लगाम लावण्यासाठी वाळू माफियावर सक्त कारवाई करत त्यांचे विरुध्द गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

याअनुषंगाने पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार विशेष पथकाने दिनांक 25/05/2023 रोज रात्री 02:30 वाजेला व सकाळी 08:00 वाजेच्या दरम्यान तीन हायवा ट्रक हे 15 ब्रास वाळुसह बेकायदेशिरपणे चोरटी वाळु वाहतुक करताना पकडून एकूण 55,60,000/- (पंचावन्न लक्ष,साठ हजार रूपयांचा) मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन तीन आरोपीविरुध्द भादंवी कलम 379 सह गौण खनिज अधिनियम चे कलम 21 (1) (2) (3)(4)(5) तर मो.वा.का. कलम 130/177 , 50/177 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यामध्ये पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण हद्यीतील भवन (कारखाना) येथे हायवा क्रमांक एम.एच. 14 सी.यु. 0880 व एक विना क्रमांकाचा हायवा असे दोन हायवा ट्रक मध्ये 10 ब्रास वाळु ही चोरटया मार्गाने अवैधरित्या बेकायदेशिररित्या वाहतुक करतांना हायवा ट्रक चालक 1) योगेश पांडूरग दांडगे वय 32 वर्षे रा. शिक्षक कॉलनी, सिल्लोड 2) शकिल ताहेर पटेल (वय 32) वर्षे रा. डोंगरगाव ता. सिल्लोड असे मिळुन आले आहे. त्यांचे ताब्यातुन दोन्ही हायवा ट्रक व 10 ब्रास वाळु असा एकुण 35,40,000/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर पोलीस ठाणे पाचोड अंतर्गत औरंगाबाद - बीड महामार्ग वरिल आडूळ परिसरातील माऊली लॉन्स जवळ हायवा क्रमांक एम.एच. 20 एफ.जी. 6322 याचा चालक ज्ञानेश्वर भानुदास तागडे वय 32 वर्षे रा. गोंदी, अंबड जि. जालना यासुध्दा विनापरवाना बेकायदेशिर रित्या चोरटी वाळु वाहतुक करतांना विशेष पथकाने ताब्यात घेतले आहे. याच्याकडून 05 ब्रास वाळू व हायवा ट्रक असा एकुण 20,20,000/- मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. नमुद कारवाई ही मनीष कलवानिया, पोलीस यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकांचे सपोनि सुदाम सिरसाठ, सफौ सुरजसिंग बिघोत, पोह/ गोपाल पाटील, भगीरथ आहेर, श्रीकांत दांडगे यांनी केली आहे.



# आर. टी. लेले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे दि. २५ पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी संचलित आर.टी. लेले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा उच्च माध्य.शालांत माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा १२ वी कला शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे .

महाविद्यालयातून रोहिणी कैलास पाटील हिने ८० . ८३ % गुण घेत प्रथम क्रमांक पटकावला आहे .शितल संजय दांडगे हिने ७९ . ३३ %गुण घेत द्वितीय तर सोज्वल गणेश पाटील हिने ७८ . ६ ७ % गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे .स्वाती अर्जुन देशमुख हिने ७५ . १७ % गुण मिळवले असून तिने चौथा क्रमांक तर वैष्णवी राजू पाटील हिने ७४ . ६० % गुण घेऊन पाचवा क्रमांक मिळविला आहे. एकूण ५२ विद्यार्थी महाविद्यालयातून प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थ्यांचे चेअरमन गिरीष महाजन, व्हा. चेअरमन साहेबराव पाटील, मुख्याध्यापक आर. बी. पाटील , पर्यवेक्षक एस. व्ही. पाटील, वरिष्ठ लिपिक किशोर पाटील यांच्यासह सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे. वर्गशिक्षक आर. टी. देशमुख यांच्यासह सर्व शिक्षकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले .



# वृक्षारोपण करून केला वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आजकाल वाढदिवसानिमित्त भर रस्त्यावर केप कापून, तो चेहऱ्याला फासून, फटाक्यांची आतषबाजी करणाऱ्या तरुणांकडे पाहता, पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुकरण सुरू असल्याचे दिसून येते. मात्र स्वतःच्या वाढदिवशी गेल्या सहा वर्षांपासून झाडे लावत ते वर्षभर जगवत झाडाचाही वाढदिवस साजरा केला.

पैठण शहरातील प्रसिद्ध डीझायनर सचिन उंडाळे यांनी वाढदिवस प्रसंगी झाडे लावण्याचा संकल्पना राबवल्याने पैठण तालुका व्यापारी म संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उगले व सचिव रामेश्वर सुसे यांनी ही संकल्पना राबवायचे ठरवले असुन प्रत्येक दुकानासमोर झाड लावून वाढदिवस साजरा करणार आहेत.या प्रसंगी भागवत करमाडकर, नामदेव शिरसाट,गोकुळ शिंदे सह मित्र उपस्थित होते.

# श्रीनाथ कनिष्ठ महाविद्यालय पैठणच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** श्री नाथ कनिष्ठ महवड्यालयाचा एकूण निकाल 91.75% लागला असुन विज्ञान विभागाचा 98.93% कला विभागाचा 87.03 % तर MCVC विभागाचा निकाल 85.71% इतका लागला आहे सायन्स विभागाचे एकूण 283 विद्यार्थी परीक्षेस बसले होते. पैकी 109 विद्यार्थीयांनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले असून 154 विद्यार्थी प्रथम श्रेणी व 17 विद्यार्थी द्वितीय श्रेणी मध्ये आले आहेत. आर्ट्स विभागाचे एकूण 324विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यातील 14 विशेष प्राविण्य 135 प्रथम तर 125 द्वितीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत. एमसीव्हींसी चे एकूण 84 पैकी 32 प्रथम तर 40 द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय पा.शिसोदे, कोषाध्यक्ष तुषार पाटील शिसोदे, सचिव यशोद पाटील, उपाध्यक्ष अमर पाटील शिसोदे, सहसचिव श्रीमंतराव शिसोदे पाटील, प्राचार्य शंकर वाघमोडे, पर्यवेक्षक, प्रवीण गोर्डे, शिवाजी जगताप, प्रा. संतोष गव्हाणे ,सुनील चितळे, पंढरीनाथ फुलझळके, प्रा.लहाने, प्रा.हिरे, प्रा. गायकवाड आदींनी केले आहे.



# शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना शिक्षकांच्या मागण्यांचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या जिल्हा परिषद नांदेड च्या वतीने शिक्षणाधिकारी ( प्रा. ) डॉ. सविता बिरगे यांच्यासोबत भेट घेऊन नांदेड जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रलंबीत प्रश्न सोडविण्यासाठी संघटनात्मक निवेदन देऊन बैठकीमध्ये मागण्या मांडण्यात आल्या. अनेक दिवसापासून प्रलंबित असलेली महागाई भत्ताची रक्कम माहे- जुनच्या वेतनात जमा करण्यात यावी.निवड श्रेणी / चटोपाद्याय आदेश लवकर निर्गमीत करण्यात यावे. सेवा जेष्ठता आणि गुणवत्तेवर आधारित केंद्रप्रमुखाचे 50% पदे पदोन्नतीने तात्काळ ही पदे समुपदेशन पध्दतीने भरण्यात यावे.मुख्याध्यापक पदोन्नती तात्काळ करुन ती पदे समुपदेशन पध्दतीने भरण्यात यावे. आंतरजिल्हा बदलीने नांदेड जिल्ह्यात अनेक दिवसापासून उपस्थित असलेल्या शिक्षकांना समुपदेशन पद्धतीने पदस्थापना देण्यात यावी.प्राथमिक पदविधर शिक्षकामधून माध्यमिक शिक्षक ( विषय गणित ) या पदासाठी सेवाजेष्टता पदोन्नतीची प्रकीया करावे. विषय शिक्षकाना वेतन श्रेणी तात्काळ देण्यात यावी. महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीस पुर्ववत मान्यता देण्यात यावी. शिक्षकाची प्रलंबीत असलेली वैद्यकीय प्रतिपुर्तीची बिले तात्काळ मंजूर करण्यात यावी. आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शिक्षणाधिकारी यांनी वरील सर्व प्रश्न कशाप्रकारे निकाली काढणार याची सविस्तर चर्चा केली. तसेच येत्या काळामध्ये लवकरच वरील मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.सदरील निवेदनावर जिल्हाध्यक्ष बाबुराव फसमले, जिल्हा सचिव बाबुराव माडगे, उत्तर सरचिटणीस भगवान गजभारे, दक्षिण प्रवक्ता विश्वेश्वर वडिले, जिल्हा उपाध्यक्ष डी.डी गायकवाड, जिल्हा संघटक दत्तात्रय मंगनाळे, पाळज बिटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मणराव सुरकार, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रवीण पाटील,शिक्षक नेते सुभाष पानपट्टे, भोकर तालुका सचिव गंगाप्रसाद समुद्रवाड, अर्चना बद्रे, बी. डी गायकवाड , नंदकिशोर मुंगळे आदींच्या स्वाक्षरीचे निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनाचे अभिनंदन मुख्य सल्लागार जीवनराव पाटील वडजे यांनी केले आहे.



# संत एकनाथ महाराज पालखी सोहळा आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आषाढी वारीसाठी पैठण येथील संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याची तयारी चालु आहे. पैठण तहसील कार्यालयात तहसीलदार शंकर लाड यांच्या अध्यक्षतेखाली संत एकनाथ महाराज पालखी प्रमुख रघुनाथमहाराज पालखीवाले यांच्या उपस्थितीत पार पडली. यंदाच्या पैठण पंढरपूर पाई पालखी रथ सोहळ्यात प्रस्तान दिवशी सोई सुविधा देण्यात याव्या व पैठण ते पंढरपूर पर्यंत पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्यात आली,यात प्रामुख्याने पहिल्या दिवशी मुक्कामी जाताना पालखी मार्गावरील स्वच्छता,मुक्काम ठिकाणी लाईट व्यवस्था,तसेच पालखी ओटा ठिकाणी स्वच्छता सोहळ्या दरम्यान वारकर्यांना औषधोपचार,अदि व्यवस्था करण्याच्या सुचना तहसीलदार यांनी उपस्थित असलेल्या अधिकार्यांना दिल्या. यावेळी योगेश महाराज पालखिवाले, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे,प्रपाठक ग्रामीण अरोग्य पथक डॉ.सिमा साळवे,कनिष्ठ अभियंता सव्वाशे,पाटबंधारेचे विजय काकडे,नाथ संस्थानचे महेश खोचे,गजानन झोल,न.पचे मुकुंद महाजन,प.स.प्रकाश लोखंडे,दशरत खरात,अरोग्य सेविका स्वाती सिरसागर,लाबंतुरे,डॉ.धोंडीराम दिवेकर,प्रशिध्दी प्रमुख चंद्रकांत अंबिलवादे,मनोज वैद सक्ष संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# शिवाजी उच्च माध्यमिकचा निकाल ९४ टक्के, जयभवानी उच्च माध्यमिकचा ९७ टक्के

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालंका देवी शिक्षण संस्था संचालित शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व जय भवानी उच्च माध्यमिक विद्यालय मोलखेडा अनुक्रमे 94.टक्के व 97 टक्के एवढा इयत्ता बारावीचा निकाल लागला पुणे राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतलेल्या बारावीच्या परीक्षाचा निकाल जाहीर झाला आहे. असून सदरील परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन व सत्कार करण्यात आला शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथील विज्ञान शाखेतून प्रथम पाटील भक्ती 86.33 द्वितीय मख गौरी प्रल्हाद 86 व तृतीय साबळे यश जनार्दन 84.67% आले तर व वाणिज्य शाखेतून प्रथम ठाखरे दीपक पंढरी 75 टक्के द्वितीय साळुंके अजय विजय 73 तर तृतीय वानखेडे विशाल भाऊराव 72 टक्के कला शाखेतून प्रथम राठोड अश्विनी भरत 76 टक्के द्वितीय सोनवणे प्रेम रामेश्वर 73 .88=टक्के तृतीय चव्हाण सचिन शालीकराम,जाधव सागर देवचंद, राठोड रोहन राजेश,जाधव विशाल विठ्ठल ,नपते शीतल श्रीरंग याना 73.330मिळून उत्तीर्ण झाले एवढे गुण मार्च फेब्रुवारी 2023 मध्ये उत्तीर्ण झालेले आहेत तर जय भवानी उच्च माध्यमिक विद्यालय मोलखेडा विज्ञान शाखेमध्ये प्रथम क्रमांक जोंधळे विवेक गोपाळ 85 % द्वितीय क्रमांक दांडगे दिव्या सतीश व राठोड ओम अंकोश 83. 33% तृतीय क्रमांक बायस अभिषेक प्रदीप सिंग व करवंदे तनवी सुधाकर 82.33% तसेच कला शाखेमध्ये प्रथम क्रमांक राठोड राहुल सुदाम 76.33% द्वितीय क्रमांक चव्हाण आरती ममराज 72.83% तृतीय क्रमांक मोरे पूनम प्रकाश 72.33% टक्के गुण मिळवून संस्थेची व शाळेची गुणवत्ता ची परंपरा कायम राखली आहे सदरील विद्यार्थी अनुक्रमे पहिला ते तिसरा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झालेले आहे सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे जय कालिंका देवी शिक्षण संस्था सावळदबारा अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते व संचालक मंडळ यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

